# श्रीसाईलीला



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं

चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री सा ई वा क्सु धा

या जगांत सौंदर्य ठायीं ठायीं भरलेलें आहे. आपलें मन सौंदर्यासक्त आहे. जिथें सौंदर्य दिसेल तेथें तें नेहमीं रमतें. परंतु ती दृष्टि मागें फिरवितां आली पाहिजे. तें केव्हां घडतें ? सत्संगामुळेंच तें घडूं शकतें. सत्संगाचा महिमा फार मोठा आहे. आपल्या ठायीं जो अहंकार असतो तो घालविण्याचें साधन सत्संग हेच होय. यासाठीं नेहमीं सत्संग धरावा. त्याशिवाय जो दुसरा संग तो अपायकारक आहे असें समजून टाळावा. प्रत्येक मनुष्याची स्वतःच्या देहावर भारी आसक्ति असते. ती सत्संगामुळें कमी कमी होत जाते. संतसंगाची गोडी लागली म्हणजे संसारासंबंधींचा मोहहि नाहींसा होतो. सत्संग घडायला भाग्य लागतें. तो उगाच वाट्याला येत नाहीं. तो एकदां का वाट्याला आला म्हणजे परमार्थाकडे जाण्याचा मार्ग मोकळा होतो आणि तेंच तर आपलें ध्येय आहे.

—श्रीसाईसच्चरित

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ] जून १९६१ [ अंक ३ रा

: संपादक :

**गो. वि. क्षीरसागर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३२६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ

दादर, मुंबई




**************** संकलक : आमचे प्रतिनिधि ****************

## बीन खर्चात बाबांचें दर्शन घडलें

**श्री.** विजयकुमार वेनी बी. ए. डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स, पो. मुधोळ, जि: अदिलाबाद हे एक साईभक्त असून ते आपणास आलेले अनुभव पुढील प्रमाणें कळवितात. सहा महिन्यापूर्वी मुधोळ येथें डे. इन्स्पेक्टर या नात्यानें माझी नेमणूक झाली. त्यापूर्वी मी नारायण पेठला शिक्षक म्हणून काम करीत होतों. १९५६ साली मला ' श्री साई सच्चरित ' वाचण्याचा सुदैवाने योग प्राप्त झाला. तें वाचल्या दिवसा-पासून श्री साईनाथाबद्दल माझ्या मनांत भक्ती व प्रेम उत्पन्न झालें व त्यांचें शिरडी येथे दर्शन घ्यावे अशी तीव्र उत्कंठा लागून राहिली. परंतु माझी आर्थिक परिस्थिति खराब असल्यामुळें नेहमी पैशांची टंचाई भासत राहिली, व शिरडीस जाणें होईना. अनेकदां बाबास हार्दिक प्रार्थना करित होतों कीं, बाबा तुमच्या दर्शनासाठीं मला केव्हां बोलावून घ्याल ? बाबांनीं एकदां माझी प्रार्थना ऐकली व अनपेक्षितपणें मला त्यांनीं शिरडीस बोलावून नेलें. तें कसें पहा :—' १९५८ सालीं मी एक धनिक गृहस्थ श्री. माणिकराव अंतु ह्यांच्या मुलास शिकवीत असे. मुलगा पास झाला. ते धनिक गृहस्थ माणिकराव अंतु हैद्राबादेंत रहात असत व मुलगा मात्र माझ्याच गांवीं ( नारायण पेठ ) शाळेंत शिकत होता. उन्हाळ्यांत माझी प्रांतीय भाषेची परीक्षा देण्यास जेव्हां मी हैद्राबादेस गेलों त्यावेळेस श्री. माणिकराव अंतु यांनीं महाबळेश्वरला जाण्याचे निश्चित केले होते. मी जेव्हां त्यांना भेटण्यास म्हणून त्यांच्या घरीं गेलो तेव्हां त्यांनीं मला आपल्याबरोबर महाबळेश्वरास येण्याचा आग्रह केला. कांहीं तयारी नसतांहि त्यांच्या आग्रहाखातर मी त्यांच्यासोबत महाबळेश्वरास गेलो. त्यांच्या स्वतःच्या मोटारीनेंच प्रवास असल्याकारणानें कुठेंही कांहींच त्रास झाला नाहीं. सबंध मे महिना महाबळेश्वरांतच होतो. जूनच्या प्रथम सप्ताहामध्यें परतण्यावेळेस त्याच्या मनांत एकदम पुण्याहून शिरडीस जावें असें आलें. श्रीसाईंच्या कृपेनें आम्ही सर्व त्याच मोटारीनें शिरडीस जावून बाबांचें दर्शन घेतलें. बाबानी मला असे अनपेक्षीतपणें, एक पैचा देखील खर्च न घालतां, आपल्या दर्शनास बोलावून घेतलें हें पाहून माझ्या शरीरावर प्रेमाचे रोमांच उभे राहिले. व आत्मशांतीच्या समाधानानें माझे डोळे सुखाश्रूनीं भिजून गेले. त्याच वेळीं मी शिरडी संस्थान कमेटीचा सभासद बनलों, माझी बाबावरची भक्ती व श्रद्धा दुणावली.

**माझा दुसरा अनुभव.**

१९५९ साली दुर्दैवाने माझे वडील दीर्घज्वराने कैलासवासी झाले. त्यावेळीं मी बी. ए. परीक्षेची फी भरली होती. वडिलांच्या मृत्यूच्या दुःखामुळें मन अस्थिर झालें व अभ्यास कांहींच झाला नाहीं. परीक्षेला जावूं नये असा विचार होता. परंतु श्री साईबाबाच्या प्रेरणेमुळें त्या निराश स्थितींतच मी परीक्षा दिली. परिक्षेच्या दिवसांत देखील अभ्यासाकडे मन लागेना. परंतु जेव्हां मी परिक्षा भुवनांत पेपराचें उत्तर देण्यास सुरवात करीत असे; कसे काय बाबाच जाणों, माझ्या डोक्यांत आपोआप प्रश्नाचे उत्तर सुचत होतें व पेन एकसारखें लिहीत होतें. सर्व पेपर्स दिले. तरीहि मी नापास होईन अशी मला पक्की खात्री होती. मी बाबांना काकुळतीनें नवस केला कीं जर तुमच्या कृपेनें मी पास झालो तर येत्या उन्हाळ्यांत मी तुमच्या दर्शनास शिरडीस अवश्य येईन. तदनंतर मी एक महिना श्रीसाई सचरिताचें अध्ययन केलें. बी. ए. चा रिझल्ट लागल्यावर माझा नंबर पेपरमध्यें पाहून माझा आनंद गगनांत मावेना. मीं बाबांचे फारच आभार मानले व ही सर्व त्यांचीच करामत आहे असा माझा ठाम विश्वास बसला व नवस केल्याप्रमाणें गतवर्षी उन्हाळ्यांत मी शिरडीस त्यांच्या दर्शनास जाऊन आलो.

**बाबांच्या उदीचा प्रभाव**

नारायणपेठ येथें आमची शेजारीण सुगम्मा रूदनुर हिच्या एका नातलगाची स्त्री गरोदरपणीं हात पाय व सारे शरीर सुजून आजारी पडली. ती अगदीं पिवळी पडली होती. तिचा प्रसूत काल जेव्हां समीप आला तेव्हां ती जगणार नाहीं अशी सर्वांची खात्रीच होती. सुगम्माची साईबाबांच्या उदीवर फार श्रद्धा होती. ती माझ्याकडून थोडीशी उदी घेवून पाण्यांत मिसळून त्या गरोदर बाईस पाजली व तिच्या साऱ्या शरीरास उदी लावली. काय आश्चर्य पहा, प्रसूत काळीं त्या स्त्रीस कांहींच त्रास न होतां ती सुखरूप सुटली. आई व मूल आतां दोघेंही सुखरूप आहेत. सुगम्मानें बाबास दोन रु. पाठण्याचा नवस केला होता तो तिनें पूर्ण केला. असें किती तरी लहान मोठे अनुभव बाबाविषयीं मला आलेले आहेत.

सर्व संकटांतून मला ते नेहमी मुक्त करतील असा माझा ठाम विश्वास आहे.

× × ×

**ही १९२२ सालची एक घटना आहे.**

शनिवार, ता. ३ जून या दिवशीं श्री. शांताराम बळवंत नाचणे, शिरस्तेदार मॅजिस्ट्रेट कचेरी कुर्ले हे भेटावयास आले होते. सेवक त्यावेळीं इन्फ्लुएन्झानें आजारी पडला होता. अंगांत ताप असून, पाठींत सारखा ठणका मारत होत्या.

श्री. नाचणे आपल्या स्वभावसिद्ध सौजन्यानें सेवक पथारीवर बसून श्रीसाई-बाबांच्या गोष्टी अत्यंत गोड शब्दांनीं सांगत होते; त्यांतली एक हकीगत वाचकांच्या प्रेमळ वृत्तींना पोषक अशीच असल्यामुळें येथें नमूद केल्याशिवाय राहवत नाहीं.

श्री. नाचणे शिरडीस गेले असतां त्यांच्या कुटुंबाला श्रीसाईबाबांनीं आशिर्वाद दिला होता कीं, 'आये, तुला एक नामी मुलगा होईल; पण तो फार दिवस लाभणार नाहीं.' त्या आशीर्वादानुसार एक सुंदर मुलगा अवतरला. मुलगा सर्वगुणी संपन्न असून अगदीं शिशुवयांत आपल्या गुणांनीं सर्वांना अत्यंत आवडता झाला. स्मरणशक्ति अद्वितीय, आज्ञाधारकता अवर्णनीय, स्वभाव सालस व अगदीं थंड; राग वगैरे स्वप्नींही नाहीं, इतकेंच नव्हे, तर कांहीं कारणानें घरांतल्या कोणाला राग आल्यास, हा मुलगा त्याच्या गोड व शांत स्वभावानें त्याचें समाधान करीत असे.

श्रीसाईबाबांच्या छबीपुढें बसून तो आरत्या वगैरे आनंदानें गात असे.

तो सुमारें पांच एक वर्षाचा झाला असेल. आपल्या बापाशेजारीं बिछान्यांत झोंपी जात असतांना पहाटेच्या सुमाराला डोक्यावर पांघरून घेऊन बसलेला तो त्यांच्या वडीलांना दिसूं लागला. तो असें कां करितो, या विषयीं त्यांनीं त्याच वेळीं विचारपूस केली नाहीं.

श्री. नाचणे म्हणाले, 'वरीलप्रमाणें प्रकार घडण्यापूर्वी एके सुटीच्या दिवशीं कै. अच्युतराव कोल्हटकरांच्या संदेशच्या स्पेशल अंकावर श्रीकृष्ण भगवंताचा एक मनोवेधक चेहरा असे, तो कातरीनें कापून घेऊन एका जाड पुठ्यावर मी चिकटवला आणि तो श्रीसाईबाबांच्या फोटोजवळ देव्हाऱ्यांत ठेवला. तसेंच हिज मास्टर्स व्हॉइस (एक फोनोग्राफ आहे आणि त्याच्यापुढें एक कुत्रा अत्यंत जिज्ञासेनें आपल्या धन्याचा आवाज त्या भुंगळींतून येत असलेला ऐकत आहे) हें चित्र पण कापून काढून एका जाड पुठ्यावर चिकटवून तें पण त्या देव्हाऱ्यांत एका बाजुस ठेविलें. असें करण्याचा माझा कांहींच विशिष्टहेतू पण नव्हता. दोन्ही चित्रें बरीं वाटल्यावरून तीं वरीलप्रमाणें शोभेसाठीं म्हणून ठेविलीं.'

असो, मुलगा याप्रमाणें डोक्यावर पांघरूण घेऊन बसत असे. असा तो कां करितो, म्हणून कांहीं दिवसानंतर त्याला हलकेंच विचारतां तो म्हणाला,

'तो कुत्रा त्या चित्राप्रमाणें आपल्या धन्याचा आवाज ऐकत आहे, आणि त्याला तो आवाज ऐकूं येत आहे हें खरें ना?'

'होय.'

'त्याचप्रमाणे मला श्रीसाईबाबांचा आवाज ऐकूं येत असतो.'

'तें कसें?'

'त्याचा अभ्यास केला पाहिजे. ह्या चित्रावरून श्रीसाईबाबांचे शब्द ऐकू आलेच पाहिजेत असे मला खास वाटलें. आणि म्हणून पहांटेच्या शांत वेळीं मी डोक्यावरून पांघरून घेऊन बसून ते शब्द ऐकण्याची हौस वाढून तसें करूं लागलों. पहिल्या पहिल्यानें घोंगाट करूं आला, तरी तसाच बसून राहिल्यानें बाबांची मूर्ति डोळ्यांपुढें येऊ लागली. त्यामुळें आनंद वाटला. पुढें पुढें बाबांचे डोळे माझ्याकडे प्रेमानें पाहतात

असेंही दिसू लागलें. तरी त्यांच्या तोंडचे शब्द ऐकण्याची हौस सोडली नाहीं. पुढें त्यांचे ओठ हालतांना दिसले. कांहीं अस्पष्ट शब्द ऐकू आले. तेव्हां तर फारच गोड वाटलें! पुढें पुढें त्यांचे शब्द अगदीं स्पष्टपणें ऐकू येऊ लागले.'

'जसे शिरडीस असतांना बाबा बोलत असत त्याप्रमाणेंच ते बोलत व मी ऐकत असें. पुढें त्यांनीं श्रीकृष्ण भगवंतांच्या चित्राकडे माझें ध्यान खेचलें.'

'श्रीकृष्ण भगवंताच्या बाळलीला दिसूं लागल्या. भगवानांचे शब्द गोड व बोबडे आहेत. त्यांचें चालणें जरा चमत्कारिक आहे. ते इतर मुलांप्रमाणें चालत नाहींत. पहिल्या पहिल्यानें ते दूर दिसत व माझ्याकडे हळूहळू चालत येत आहेत असें दिसूं लागलें. नंतर ते झपाट्यानें दुडदुड धांवत येऊन माझा हात धरून आपल्या सर्व लीला त्यांनीं मला प्रत्यक्ष दाखविल्या.'

'हें पाहा! श्रीकृष्ण भगवंत आपल्या लीला त्याच त्याच रोज एकाच तऱ्हेनें तुला दाखवितात कीं कसें?'

'नाहीं. दररोज त्या लीलामध्यें पुष्कळ निरनिराळ्या तऱ्हा असतात. तें पाहा एकदा श्रीकृष्ण भगवान एका संवगड्याच्या पाठीवर बसून शिंक्यातल्या दुधाच्या मडक्याला भोंक पाडून सर्व गोपाळांच्या तोंडांत त्याची धार फिरवीत होते. ज्या गोपाळाच्या पाठीवर ते बसले होते, त्याला आपणालाही ती दुधाची धार मिळावी असें वाटलें. तेव्हां त्यानें आपल्या पाठीवरल्या पायांच्या पान्यांना हळूच गुदगुल्या केल्या व आपली मान बाजूला वळऊन तोंड उघडून आ केलें. श्रीकृष्णानें तें जाणून त्या दुधाची धार अशी फिरविली कीं, ती बरोबर त्याच्या तोंडून गेली. आणि माझी खात्री आहे कीं, भगवंताच्या लीलांच्या वर्णनांत तीं तुम्हाला कोठेंही आढळणार नाहीं.'

प्रेमळ व भाविक वाचक हो, हें वाचतांना आपणाला काय होत असेल, अष्टभाव कसे प्रदीप्त होत असतील व डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहून कंठ सद्गदित होऊन सर्वांगावर स्वेदादि भावना कशा होत असतील याची अंधुक कल्पना सेवकासारख्याला आधुनिक विद्येनें मन दूषित झाल्यामुळें आणि त्यामुळें फाजिल चिकित्सक भावनांना प्रोत्साहन मिळालें असूनही झाली, तो आपलें दुखणें विसरला; बिछान्यांत बसून श्री. नाचणे यांच्या तोंडांतून निघणाऱ्या शब्दौघांचें प्राशन बुभुक्षित् रीतिनें करीत होता.

श्री. नाचणे म्हणाले, 'बाबासाहेब, हें गोड रत्न श्रीसाईबाबांनीं सांगितल्याप्रमाणें आम्हाला पांच वर्षांचा झाल्यावर एक दिवशीं साधारण ताप आला. रीतसर औषधोपचार आम्ही केलेच. प्रयाणाच्या दिवशीं सकाळीं आपल्या गळ्यांतला श्रींचा फोटो काढून तो माझ्याजवळ दिला आणि म्हणाला, 'आतां मला याचा उपयोग नाहीं.' तो असें काय करतो हें कळेना. नंतर कांहीं वेळानें श्रींच्या देव्हाऱ्यांतल्या छबीकडे पाहत व त्यांची आरती म्हणत बसल्या बसल्या आपला देह माझ्या अंगावर ठेविला.'

याप्रमाणें सेवकाच्या डळमळणाऱ्या मनोवृत्तीच्या आंदोलनाला स्तब्ध करून व सेवकावर पूर्ण कृपा करून श्री. नाचणे कुर्ल्यास गेले.

त्या रात्रीं व नंतर सेवकाच्या मनोवृत्तींना त्याच्या आधुनिक शिक्षणप्रभावांप्रमाणें चालना मिळाली.

त्या मुलाला ( (Illusion) इल्यूझन अथवा (Hallucination) हॅल्यूसिनेशन ( कल्पित अथवा अकल्पित प्रकार ) दिसून येत होते काय? पण असे प्रकार दिसणें हा एक मेंदूचा विकार आहे, आणि अशा प्रकारानें पीडित मनुष्य एकलकोंडें व सर्वांपासून दूर असणें अशा प्रकारानें वावरत असतें. चर्येवर एक प्रकारची खिन्नता अथवा निस्तेजता दिसून येत असते. असा प्रकार या मुलाच्या ठिकाणीं मुळींच नव्हता. चर्या सुप्रसन्न, वृत्ति आनंदी, बोलणें, चालणें, खेळणें उत्तम ( Healthy ) निरोगी मुलाप्रमाणें. तर त्या मुलाला वरीलप्रकारें वर्णन केलेल्या मानसिक व्यथा तर खास नव्हत्या. तर मग हा प्रकार होता तरी काय ?

ज्याला इंग्रजींत हॅल्युसिनेशन म्हणतात तसा जर हा प्रकार असता तर त्या मुलाची दृष्टि बावरलेली दिसती. हॅल्यूसिनेशन झालेल्या मनुष्याला एकाच प्रकारचा दृष्टिविकार झालेला असतो, आणि तोच एकच देखावा त्याच्या नजरेपुढें येतो. डोळ्यांचा विकार झालेल्या मनुष्याला कोळीष्टकें वगैरे दिसतात व तीं खालींवर नाचत असतात. कित्येकांना डोळ्यांतल्या रेटिना ( पडद्या ) वर कांहीं विशेष ठिकाणीं विकार झाल्यामुळें कुत्रीं, ससे, हरणें वगैरे दिसतात; आणि त्यामुळें त्यांची चित्तवृत्ति अस्वस्थ होऊन ते व्याकुळ होतात.

तशा तऱ्हेची वरील मुलाची वृत्ति मुळींच नव्हती. आतां एखादा कुशल कारागीर आपल्या मानसिक सृष्टीपुढें एखादें मनोरम चित्र रेखाटून तें चित्रपटावर रंगवून जगाला आश्चर्यचकित करीत असतो, तशा प्रकारानें दृष्टि ठेवून विचार केला असतां या मुलाची मजल सदर चित्रकारांच्या किती तरी पुढें गेली होती !

सारांश, जें मुळांत शुद्ध, त्याचें पाश्चात्य चिकित्सक पद्धतीनें कितीहि संशोधन केलें, तरी तें लंगडें लुळें पडणार; म्हणून सेवक अत्यंत नम्रपणें कोणाहि विद्वान डॉक्टराला आवाहन करीत आहे कीं, या मुलाच्या डोळ्यांना अथवा मेंदूला अथवा शरीराला काय विकार झाला असावा याचें त्यानें अंशतः तरी लेखकासारख्या अज्ञ मनुष्याला समजवून सांगून त्याचें समाधान करावें.

श्री. नाचणे यांनीं ही हकीकत बऱ्याच दिवसांपूर्वी लेखकाला सांगितली. त्यानें ती तात्काळ लिहून ठेवली, आणि त्या हकीकतीवर आजपर्यंत पाश्चात्य पद्धतीनें चिकित्सा करून लिहितां येईल तर तसें करून पाहावें म्हणून निदिध्यास केला. काय करूं, काय लिहूं, कसें लिहूं, म्हणून पुष्कळ विचार केला. पण जें मुळांत शुद्ध, बुद्ध, त्यावर पाश्चात्य पद्धतीची चिकित्सा करावयास मुळींच वाव मिळेना. म्हणून मनोविकार जाणणाऱ्या डॉक्टरांना सरतेशेवटीं निरुपायानें हें आवाहन देणें भाग पडत आहे.

आतां आपल्या अध्यात्म दृष्टीनें विचार करूंया :—या दृष्टीनें पाहतां खरोखरीच संत व श्रीभगवंतांच्या छातीठोक वचनांचा उलगडाच झालेला दिसतो.

हा मुलगा उत्तम दैवी संपत्तिवान यांत मुळींच संशय नाहीं. श्रीसाईबाबांच्या आशीर्वादाचें फळ तें. त्याचें वर्णन कोणत्या शब्दांनीं करावें !

'मी हवा असल्यास अभ्यास करा,' 'मी तुमच्यापाशीच आहे,' 'मी हृदयस्थ आहे,' 'तुमच्या शरीराचा मालीक मी,' 'शोधा, शोधा, मी दूर नाहीं,' 'रानावनांत जाणें नलगे,' वगैरे कितीतरी छातीठोक वाक्यें स्मृतिपटावर उभीं राहतात. आपण क्षणैक विचार करतों आणि 'अगम्य' 'अतर्क्य' अशा शब्दांनीं श्रीभगवंताला दूर दूर ढकलीत असतों.

अशा दैवी मुलाचें चरित्र ऐकिलें म्हणजे तात्काळ 'काय हो तरी पूर्वजन्मींची त्याची तयारी असली पाहिजे !' असें म्हणून आपण ती पळपुटी वाट पकडीत असतों.

अहो, भक्त्या एकांतिना मुख्या:' असें देवर्षि नारदमुनि आपल्या दैवी भक्तिसूत्रांत बोलून गेले आहेत; मग आमच्यासारख्या संसारत्रस्त माणसांनीं एकांतवास तो कसा मिळवावा; आम्हीं शहरांत, चाळींत राहणारीं माणसें, कुठला एकांतवास आणि कुठलें काय !

पाहा, या लहान जीवानें आपणांला काय दाखविलें तें ! चाळीतल्या वस्तींत बापाच्या पथारींत पहांटेच्या शांत वेळी डोक्यावर पांघरूण घेऊन त्यानें प्रभुप्राप्तीप्रीत्यर्थ एकांत साधला. आम्हीं तसें करूं जातां एखादें चिलट गुणगुण करीत अथवा एखादा ढेंकूण अथवा पिसू आमच्या एकांताची विल्हेवाट करतें. काय त्या मुलाला ढेंकूण, पिसू, अथवा चिलट यांनीं त्रास दिला नसेल ? जरूर दिला असलाच पाहिजे. पण जेथें श्रीसाईबाबांचे शब्द ऐकण्याची हौस आणि त्याप्रीत्यर्थ चिकाटी आणि तीव्र उत्कंठा, तेथें श्रीसाईबाबांच्या कृपेनें ढेंकूण, पिसू अथवा चिलट काय करणार आहेत ?

आतां त्या मुलाच्या साधनांची सिद्धता पाहूं. याविषयींचा दाखला श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या चरित्रांत व बोलांत उत्तम प्रकारें दिसून येतो. 'एखाद्या यात्रेच्या ठिकाणीं जात असतां दुरून एकसारखा घोंगाट ऐकूं येत असतो. जसजसें जवळ जावें तसतसें कांहीं अस्पष्ट शब्द ऐकूं येतात. आंत यात्रेंत शिरकाव होतांच, आजूबाजुला पाहिजे तितका घोंगाट चाललेला असतानाही ज्या दुकानापाशीं आपलें काम असेल त्या दुकानदाराबरोबर आपण स्पष्ट रीतीनें संभाषण करूं शकतों.'

तोच प्रकार या मुलाच्या साधनांत स्पष्ट दिसून आला. श्रीसाईमाऊली क्रमाक्रमानें त्याचा उत्साह व त्याची जिज्ञासा पाहून त्याच्याबरोबर बोलली. आणि त्याचें अध्यात्मिक कल्याण व्हावें या हेतूनें संदेशांतील श्रीकृष्ण भगवंताच्या मनोहर चित्राकडे त्याचे ध्यान लावून देवाच्या त्या अत्यंत मनोवेधक बाललीलांचा त्या मुलाला अनुभव देवविला.

आतां आपण पुन्हा आपल्या पाश्चात्य चिकित्सक पद्धतीवर येऊं. तुम्ही म्हणाल कीं, कदाचित् श्री. नाचण्यांच्या येथें अथवा इतर कोठें श्रीभागवताचें पारायण त्या मुलाच्या कानांवरून गेलें असेल, कदाचित् श्री. फाळक्यांच्या चित्रपटांतला खेळ त्या मुलानें पाहिला असेल, अथवा त्या चित्रपटांचें वर्णन अथवा रस्त्यावर चिकटविलेलीं चित्रें ( पोस्टर्स ) त्यानें पाहिलीं असतील, आणि त्यांचा त्याच्या मनावर परिणाम झाला असेल. क्षणभर आपण तसें झाल्याचें गृहीत धरूं या, तरी चित्रपटांत अथवा श्रीभागवतांत न वर्णन केलेले असे जे देखावे—नित्य नवे असे—तें मूल साक्षात् अनुभवून आपल्या वडिलांस सप्रेमपूर्वक सांगतें त्याचा काय खुलासा? पाहा पाहा ( Mental Therapy ) मानसिक औषधोपचाराच्या पुस्तकांचे व तीं लिहिणाऱ्या प्रख्यात् शास्त्रज्ञांचे आधार मिळाल्यास पाहा!

त्याला आधार त्या शास्त्रांत मिळावयाचे नाहींत. श्रीभगवंताच्या श्रीगीतेंतल्या जीवंत वचनांत, तसेंच संतांच्या अनुभवशास्त्रांत व श्रीसाईमाउलीच्या शिकवणींत ते आधार तात्काळ मिळतील—नव्हे मिळतात.

आणखीन काय लिहावें बरें! हे दैवी मुला, तुझ्या गोड अनुभवावरून त्या मार्गानें न जातां केवळ जनमनरंजनार्थ तुझ्या अनुभवांवर चिकित्सा करण्याच्या खोडसाळ वृत्तींत पडलों, याची तूं क्षमा करशीलच अशी याचना करून, श्रीमाउलीच्या या सुंदर लीलेचें यथामति, यथाशक्ति वर्णन करून हा लेख त्या गोड माउलीच्या पायांपाशीं सद्‌गदित अंतःकरणानें सादर करीत आहे.

—'म्हातारा'




# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**

# दुःखतापापासून मुक्त होण्याचा मार्ग

**मुख दुःखाला कारण होणारी प्रेरक दैवी शक्ति तुमच्याठायींच वास करीत आहे. तिला शरण जाऊन प्रत्येक कार्य तिला समर्पण करण्यांतच तुमचें कल्याण आहे. हें तुम्हीं ओळखलें पाहिजे. जो कोणी हें ओळखील तोच सुखी होईल.**

आपण संसारांत वावरत असतों. दिवसामागून दिवस जात असतात. नाना प्रकारच्या स्थित्यंतरांतून आपणास जावें लागत असतें. चढ उतार, सुख दुःख मधून मधून आपल्या वाट्याला येतच असतात. कधीं आपण सुखी तर कधीं दुःख सागरांत डुबलेले असतों. हें असें कां बरें होतें ? आम्हीं वेळोवेळीं आपल्यापुढें दत्त म्हणून उभे रहाणाऱ्या प्रसंगांकडे कोणत्या चष्म्यानें पहावें ?

**हें कसें झालें !**

आपल्या जीवनांत जें जें कांहीं घडतें त्याच्यामागें ईश्वरी हात निश्चितपणें असतोच असतो. तो विधिसंकेत असतो. ती ईश्वराची पूर्व योजना असते. जें व्हायचें तें ईश्वराच्या दरबारांत अगोदरच ठरून गेलेलें असतें. ईश्वरी योजनेप्रमाणें बरे वाईट किंवा सुख-दुःखाचे प्रसंग आपल्या वाट्याला येत असतात. एखादा असा प्रसंग आपल्या जीवनांत घडून येत असतो कीं, आपण आश्चर्यानें दिङ्मूढ होऊन जात असतों. हें कसें झालें असें वाटून आपण आश्चर्यचकित होऊन जात असतों. त्यामुळें आपण कधीं कधीं चिडतों, संतापतों. देवाच्या नावानें खडे फोडूं लागतों. अमक्या तमक्यामुळें तें घडलें असा दोषारोपही आपण करतो. सारे लोक आपल्या विरूद्ध उठले आहेत; सारें जग आपल्यावर अत्याचार करण्यासाठीं पुढें सरसावलें आहे असें वाटूं लागतें. अशा स्थितींत अनेक वार आपण असहाय्य व हातबद्ध होऊन जात असतों.

परंतु कशाला ही धडपड व सारी आदळ आपट ! आपण आपलें कर्तव्य पालन करावें. त्याच्या फळाची यत्किंचीतही अपेक्षा करूं नये. जें केलें तें देवार्पण अशा शुद्ध भावनेनें करावें; देवांशीं संधान जोडावें. देवाच्या नावें व देवासाठीं म्हणून केलेलें कृत्य तुम्हाला देवासन्निध अधिकाधिक घेऊन जाईल. तो पतीतपावन तुमचें अंतःकरण अधिकाधिक शुद्ध व निर्मळ बनवील. तुमची चिंता, तुमची तळमळ व मनाची भगभग दूर करील.

**संबंध भगवंताशीं जोडावयाचा**

जगांतील कोणत्याही माणसाशीं नाहीं, तर भगवंताशी आपणाला संबंध जोडावयाचा आहे. माणसांचे संबंध काय ? कधीं सुखावह तर कधीं दुःखावह व्हावयाचे. भगवंताशीं जोडलेला संबंध सुख व समाधानालाच कारण व्हावयाचा. भगवंताचें

नांव घेऊन तुम्हीं कोणतीहि गोष्ट करूं लागला म्हणजे तुमच्या अंतःकरणांतील देवत्व आपोआप जागृत होऊं लागेल. अंतःकरण प्रेममय व शुद्ध होऊं लागेल.

आजकाल आपण कलियुगांत वावरत आहोंत. या युगांतील वातावरण दूषित, राग–द्वेष–मत्सरादि दुर्गुणांनीं व्यापलेलें आहे! मायामोहाचें जाळें आमच्या सभोंवार जिकडे जावें तिकडे पसरलेलें आहे. त्या जाळ्यांतून पार पडावयाचें आहे. तें पार पडणें पुरुषोत्तमाच्या चिंतनाशिवाय शक्य नाहीं. त्याचें ध्यान, त्याचा जप या गोष्टी केल्यानें तुमच्या अंतःकरणांतील सारीं पापें धुतलीं जातील. तोच एक नामी उपाय आहे. त्याचा आपण आधार घ्यावयाचा आहे.

## कठीणता नाहींशी होईल

आपल्यावर एखादें संकट ओढवलें, हात पाय काम करीनासे झाले तर तशावेळीं भगवंताचें चिंतनच तुमचें रक्षण करूं शकेल. तें चिंतन तुम्हीं मग कोणत्याहि नांवानें करा. तें करा; परंतु शुद्ध अंतःकरणानें व भक्तिभावपूर्वक करा. मग पहा; परमेश्वरी शक्ती तुमच्या सहाय्याला धांवून येईल. तुमच्या कार्यांतील कठीणता नाहींशी होत जाईल. तेथें सुलभता येऊं लागेल. तुमचें अंगिकृत कार्य पार पडण्याच्या मार्गाला लागेल.

कोणतेंहि कार्य ईश्वरापर्ण करणें याचा अर्थ काय? ईश्वरार्पण करणें म्हणजे त्या ईश्वरी शक्तिशीं संबंध जोडणें. ती शक्ति सर्वांत बलाढ्य आहे. तिच्यापुढें इतर सर्व शक्तींना हात टेकावे लागतात. त्या शक्तीशीं तुम्हीं एकदां संबंध जोडला म्हणजे मग पहा! तुमच्या मार्गांतील काळोख, अडीअडचणी दूर दूर होत जातील. सर्वत्र प्रकाश दिसूं लागेल.

## गलित धैर्य कां व्हावें !

विपरीत परिस्थिति, अनंत अडचणी, आपत्ति कधीं ना कधीं वाट्यास यावयाचींच. त्यामुळें आम्हीं गलित धैर्य कां बरें व्हावें? त्यामुळें आमची शांतता आम्हांला कां बरें सोडून जावी? संसारांत हें असें चालावयाचेंच. संसार चक्र सतत फिरत आहे. रहाटाचे मोघे कधीं भरताहेत तर कधीं रिकामे होताहेत. तें तसेंच व्हावयाचें; तें तसें होत राहूं द्या. त्यामुळें तुम्हीं दुःखी कष्टी होऊं नका किंवा आनंदानें बेहोषही होऊं नका. तुम्हीं भगवंताच्या हातांतील एक खेळणें अहांत. तें तसेंच खेळणें होऊन रहा. तो खेळवील, तो नाचवील तसा नाचऊं द्या. खरोखर, आपण त्याच्या हातांतील खेळणीं आहोंत.

ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्व भूतानि यंत्रारूढानि मायया ॥

गीतेंत भगवंतानीं हेंच नाहीं का सांगितलें ?

आपण जें जें करतों, जो विचार करतों तें करविणारी भगवत शक्ति ; शक्ति आपणास नाचवील व खेळवीत आहे. हें

पाहिजे व म्हणूनच सारा भरिभार त्याच्यावर सोपऊन आपण या संसारांत वावरूं लागलें पाहिजे.

**आमच्या सामर्थ्याचें केंद्र**

आपण जें जें कांहीं करतों त्याचा आदेश देणारी एक महान् शक्ति आपल्या अंतःकरणांत वास करीत आहे. ती दिव्य शक्ति, तो अंतरात्मा दयाळु व कृपाळू आहे. तो आमच्या कल्याणासाठीं झटत असतो; परंतु या गोष्टीची जाणीव न होऊन आपण त्या शक्तीला धाब्यावर बसवून सैरावैरा पळत असतों. तें आमच्या सामर्थ्याचें केंद्र आहे. आम्हीं त्या शक्तीला शरण गेलें पाहिजे. जें जें कांही करूं तें तें त्या चित्शक्तीला समर्पण केलें पाहिजे.

कधीं कधीं दुःखाचे, चिंतेचें व बेचैन होण्याचे प्रसंग उद्भवत असतात. अशावेळीं गडबडून न जातां आम्हीं त्या शक्तीला शरण गेलें पाहिजे. त्या हृदयस्थ भगवंताची करुणा भाकली पाहिजे. तीच आम्हांला तारणारी व संकट पार करणारी शक्ति आहे. ती दूर का आहे आपल्यापासून? अज्ञानामुळें आपण तिला दूर लोटली आहे. ती अगदीं सन्निध आहे. तिच्याशीं संधान बांधा. मग पहा! दुःख, संकटें व आपदा तुमच्या वाऱ्यालाही उभ्या रहाणार नाहींत.

---

या जगांत खरें तसेंच गोड बोलणारीं माणसें क्वचितच आढळून येतात. तुमच्या पहाण्यांत असा कोणी आल्यास त्याला प्रेमादरपूर्वक वंदन करून त्याच्या सहवासांत येण्याचा प्रयत्न करा. तसेंच ज्यानें जिभेवर जय मिळविला आहे व ज्यानें क्रोध आटोक्यांत आणिला आहे असा महात्मा दृष्टीस पडणेंहि मुष्कील आहे. तुमच्या भाग्यानें असा महापुरुष कधीं आढळलाच तर त्याची पाठ सोडूं नका.

---


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमचीं कोठेंही शाखा नाहीं. ***

# भगवद्भक्त गणपती भट्ट

**गणपती भट्ट देवभक्त होता. त्यानें देवदर्शनाचा ध्यास घेतला होता. त्याला तें घडलें का? घडलें, परंतु तें कोणत्या परिस्थितींत?**

कर्नाटक प्रांतांतील एका गांवीं गणपती भट्ट या नांवाचे एक भगवद्भक्त रहात असत. ते विद्यासंपन्न तसेच आचारसंपन्न होते. त्यांची भगवंतावर आत्यंतिक निष्ठा होती. त्यांनीं सुखोपभोगांचा व विषयादि जागतिक गोष्टींचा त्याग केला होता. देवाची पूजाअर्चा, आराधना, चिंतन व ध्यान या भाविक गोष्टींतच ते सदासर्वकाळ निमग्न असत. हा संसार असार आहे. या संसारांतील प्रत्येक गोष्ट नाशिवंत आहे. प्राणिमात्र सर्व आज ना उद्यां लयाला जाणार आहेत. नित्य सत्य जर कोणी असेल, तर तो एक जगन्नाथ. त्याची सेवा करणें, त्याच्यावर श्रद्धा ठेऊन वागणें हेंच या जन्मीं आपलें एकमेव कर्तव्य आहे असें ते मानीत असत. त्याची कृपा संपादन करण्यासाठीं प्रत्येकानें मनोभावें झटावयाचें आहे. त्याच्याशिवाय आपला उद्धार होणार नाहीं हें सारें खरें; परंतु तो आहे कुठें ? तो कसा प्राप्त होणार ! तो सगुण आहे. निर्गुण आहे. अणुरेणूमध्यें आहे. लहानांत आहे, तसाच मोठ्यांतही आहे. परंतु तो आहे तरी कुठें ? त्याचें निवासस्थान आहे तरी कुठें ? माझ्या डोळ्यांना त्याचें दर्शन कसें घडणार ? तो मंगल दिवस कधीं उगवणार ?

## निलगिरीवर ब्रह्माचें वास्तव्य

गणपती भट्ट भगवंताच्या भेटीसाठीं अत्यंत आतुर झालेले होते. दुःखीकष्टी अंतःकरणानें शास्त्रें, पुराणें धुंडाळीत होते. अशा रीतीनें दिवसांमागून दिवस जात होते तसतशी त्यांची उत्कंठा वाढत चालली होती.

शास्त्रीय ग्रंथांचें पाठांतर करतां करतां ब्रह्मपुराणांत त्यांनीं वाचलें कीं, साक्षात् परब्रह्म स्थूलरूप धारण करून निलगिरींत वास करीत आहे. त्याचें दर्शन घेतल्यानें मनुष्यमात्रास मोक्ष प्राप्त होतो.

झालें. भटजींना वाटलें कीं, आपणांस जें हवें होतें तें सांपडलें एकदांचें ! ते आनंदानें बेहोष झाले. त्यांना त्याक्षणीं मोठें समाधान वाटलें. ते स्वतःशींच म्हणूं लागले कीं, काय करायचा आहे हा संसार पसारा ! हें मायाजाल तोडून तोडून आपण मोकळें झालें पाहिजे. स्त्री, पुत्र हा परिवार काय कामाचा ? यांच्या मायेनें आपण गुरफटून कां म्हणून रहावयाचें ! या मृत्युलोकांत निलगिरीवर परब्रह्म वास करीत आहे-तेथें जाऊन आपण पुण्यपावन होण्यांत जन्माचें सार्थक आहे. मी किती मूर्ख आहे. या संसाराच्या मायाजाळांत गुरफटून जाऊन विनाकारण काळ कंठीत आहे ! इतकीं

वर्षे झालें तें झालें. आतां आपण न थांबतां लौकर निलगिरी गांठावयाचा व ब्रह्माचें दर्शन घेऊन जन्मा आलियाचें सार्थक करावयाचें, या शरिराचा काय बरं भरंवसा? तें नाशिवंत आहे. या जगांत कोण कोणाचा नाहीं. शरीर आपलें नाहीं, मग इतरांचें काय?

## गणपती भट्ट प्रवासास निघाले

अशा रीतीनें विचार करतां करतां गणपती भट्टजींनीं ठरविलें कीं, आतां विलंब लावण्यांत अर्थ नाहीं. लौकर प्रवासास निघून निलगिरी एकदांचा गांठायचा. शेवटीं सर्वस्वाचा त्याग करून, कशाचाहि लोभ न बाळगतां भटजी घराबाहेर पडले. त्यांनीं ब्रह्म पुराणाची पोथी आपल्याबरोबर घेतली होती व देवाच्या नांवाची सोबतहि बरोबर होती.

प्रवास सुरू झाला. तो बराच लांबचा होता. वाटेंत कोणी भिक्षा घातली तर घ्यायची. फळें, मुळें जें कांहीं मिळेल तें संतोषानें खाऊन जठराग्नि शांत करावयाचा. बरें, कांहीं मिळालें नाहीं तर उपवास करावयाचा. कोणावर राग नाहीं, रोष नाहीं, प्रवास शांतपणें, व नामस्मरणपूर्वक चालू होता.

अशा रीतीनें प्रवास करीत करीत भटजी महाशय अठरत्नाला याठिकाणीं येऊन पोहोंचले, म्हणजे काय? निलगिरीच्या अगदीं सन्निध आले. त्या गांवीं त्यांनीं विश्रांतीसाठीं मुक्काम ठोकला. एका धर्मशाळेंत उतरलें होते. देवाचें चिंतन सतत चालू होतें. तेथें अनेक लोक येत जात होते. ते सारे आनंदित होते. त्यांचे चेहरे प्रफुल्लित दिसत होते.

## काय तो आनंद!

त्यांचा तो आनंद पाहून भटजी महाशयाच्यानें रहावेना. ते चौकशी करूं लागले. 'अहो! लोकहो! तुम्हांला एवढा आनंद तरी कसला झालेला आहे? काय सांपडलें आहे असें तुम्हांला?'

'अहो! महाराज! विचारतां काय? आम्ही नीलाचलवरून नुकतेच ब्रह्माचें दर्शन घेऊन आलों आहोंत. आम्हीं त्याच आनंदांत आतां आपापल्या घरीं परत जात आहोंत!' त्यानीं उत्तर दिलें.

तें उत्तर ऐकून गणपती भट्ट आश्चर्यचकित झाले. त्यांना तें खरेंच वाटेना. 'खरंच काहो! तुम्हांला दर्शन घडलें?'

'खरंच म्हणून काय विचारतां? आम्हीं खोटें कशाला सांगूं आपणांला?'

गणपती भट यांस तरीही खरें वाटेना. ब्राह्माचें दर्शन झाल्यानंतर मनुष्य परत घरीं कसा जाऊं शकेल? तो तेथेंच ब्रह्माशीं विलीन झाला पाहिजे तो तेथून परत फिरूं शकणार नाहीं. असें त्यांचें ठाम मत होतें.

## भगवंताला दया आली

भट्टजी पुन्हां विचारमग्न झाले. यात्रेकरूंचा तांडा एकसारखा येत होता. त्यांनीं

ब्रह्मपुराण उघडून पुन्हां पाहिलें. त्यांत ' निलगिरीवर ब्रह्माचें वास्तव्य आहे ' असें चक्क लिहिलें होतें.

मनींचा संशय कांहीं केल्या फिटेना. विचारचक्र सुरू झालें. हें कोडें सोडवायचें कसें ? निलगिरीवर ब्रह्म आहे म्हणावें तर तेथून लोकांचे तांडे परत येत जात आहेत. मी घरदार सोडून आलों आहे. ब्रह्माची भेट तर झाली पाहिजे. त्याशिवाय स्वस्थता मिळणार नाहीं.

भटजींचा अशा रितीनें विचार चाललेला होता. भगवंताला त्याची दया आली. आणखी किती दिवस त्यांना संशयांत ठेवायचें ? एका ब्राह्मणाचें रूप धारण करून भगवंत त्यांच्यापुढें येऊन उभे राहिले व म्हणाले, ' महाराज आपण विचारांत पडलेले दिसतां ? आपण आलांत कोठून ? काय विचार आहे आपला ? कुठें जायचें आहे आपल्याला ? मला सारें कांहीं सांगा. माझ्याकडून होईल ती मदत मी करीन. निःशंकपणें मला काय असेल तें सांगा !

गणपती भट्ट हे त्या ब्राह्मणाच्या बोलण्यानें भाळून गेले. त्यांच्याजवळ आपलें अंतःकरण मोकळें करावे असें त्यांना वाटूं लागलें.

भट्टजीनी सर्व घडलेली हकिगत सांगितली; व म्हणाले, ब्रह्माचें दर्शन व्हावें म्हणून मी आतुर झालों आहे. त्यासाठीं तर सर्वस्वाचा त्याग करून मी येथवर आलों. याठिकाणीं नीलाचलहून आलेले असंख्य यात्रेकरू मला भेटले. ते परत घरीं जात आहेत. त्यावरून तेथें त्यांना ब्रह्माचें दर्शन झालें असेल असें मला वाटत नाहीं.

### ब्राह्मणाचा सल्ला

तो ब्राह्मण म्हणाला, परमात्मा म्हणजे कल्पतरु होय. त्याच्याजवळ जाणाऱ्यास इच्छिलेलें मिळतें. दर्शन घेऊन ज्यांना घरीं जायचें असतें त्यांना ईश्वर घट्ट बांधून का ठेवणार आहे ! ज्यांना मोक्ष पाहिजे असेल त्यांना तो मोक्षाप्रत पाठवितो. महाराज ! आपण आतां विलंब न लावतां नीलगिरीवर जा. तेथें ब्रह्मदर्शन घेऊन कृतार्थ व्हा. तुमचें कल्याण होईल. '

एवढें बोलून तो ब्राह्मण तेथून निघून गेला. भट्टजींच्या मनावर सहाजिकच त्याच्या बोलण्याचा इष्ट परिणाम घडून आला.

ते तसेच पुढील यात्रेला निघाले. निलगिरीवर जाऊन त्यांनीं देवाचें दर्शन घेतलें; परंतु त्यांचें समाधान कांहीं केल्या होईना. त्यांचें इष्टदैवत श्रीगणेश होतें. गणेश म्हणजेच ब्रह्म अशी त्यांची कल्पना. गजमुखाचा गणेश त्यांना पहायचा होता. तो त्यांना तेथें दिसला नाहीं.

### श्रीगजाननाचें दर्शन

भगवंताला काळजी पडली. आतां या भक्ताचें समाधान केलें पाहिजे. भट्ट तेथून गाशा गुंडाळून परत निराशेनें जाण्याच्या तयारींत होते. भगवंतानें एका पंड्याच्या

स्वप्नांत जाऊन त्याला भट्टजींना परत दर्शन घडविण्याची विनंति करविली. पंड्यानें भट्टजींची अडचण ओळखली. त्यानें आग्रहपूर्वक पुन्हां देवाचें दर्शन घेण्याची त्यांना विनंति केली. भट्टजींनीं ती मान्य केली.

गणपती भट्ट पुनरपि मंदिरांत आले व डोळे भरून भावनावशतेनें देवदर्शन घेऊं लागले तेव्हां काय आश्चर्य! त्यांना त्यांची इष्ट देवता—श्रीगजानन त्यांना दिसला.

भट्टजी आनंदानें बेहोष झाले. ते तेथें श्रीगजानन स्तोत्र म्हणून त्याची मनोमन प्रार्थना करूं लागले. सद्गित झाले. तल्लीन झाले. त्यांची समाधि लागली व त्यांतच ते मिलीन झाले.

शेवटीं गणपती भट्टजींची मनकामना भगवंतांनीं पूर्ण केली.

---

## लेखकांस विनंती

'श्री साईलीला' मासिकाचें ध्येय व धोरण सर्वांना माहित झालेलें आहे. श्रीसाईबाबांची शिकवण, साधुसंतांची शिकवण, साधुसंतांची चरित्रें, आठवणी त्याच-प्रमाणें साधकाचें व मुमुक्षूजनांचें अध्यात्म मार्गांत मार्गदर्शन होईल अशा प्रकारचे विचारप्रवर्तक व मार्गदर्शक लेख व कविता श्री साईलीलेंतून प्रसिद्ध व्हावे व अशारीतीनें श्रीसाईबाबांची सेवा घडावी, यासाठीं आमचे प्रयत्न चालू आहेत. या कार्यांत आमच्या लेखक—वाचकांनींहि यथाशक्ति सहभागी व्हावें अशी विनंती आहे.

लेख मार्जिन सोडून कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरांत लिहिलेला असावा.

श्रीसाईलीलेच्या ध्येयधोरणाशीं अनुकूल अशाच लेखांना योग्य वेळीं प्रसिद्धि दिली जाईल.

—संपादक—श्रीसाईलीला

---


**लहान मुलांच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाला वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# मला आत्मज्ञान कसें झालें ?

—रमण महर्षि

श्री रमण महर्षि यांचा अकरावा जयंत्युत्सव गेल्या महिन्याच्या बारा तारखेस ठिकठिकाणीं साजरा झाला. आधुनिक काळांतील अत्यंत थोर संतमहात्म्यांत त्यांची गणना केली जाते. भारतीय भक्तांचेंच नव्हे तर कितीतरी परदेशीय भक्तांचें जीवन त्यांनीं उजाळून सोडलें आहे. त्यांनीं आपला अनुभव पुढीलप्रमाणें कथन केला आहे:—

मी मदुरा येथें रहात होतों; परंतु तेथून मी निघण्यापूर्वी सहा आठवडे अगोदर माझ्या जीवनांतील अत्यंत क्रांतिकारक अशी एक घटना घडून आली. आणि ती घटना खरोखर आकस्मिक होती तशीच आश्चर्यकारकही होती.

## एक विचित्र घटना

माझ्या काकाच्या घरीं मी रहात होतों. त्या घराच्या पहिल्या मजल्यावरील एका खोलींत मी एकटाच बसलों होतों. कोणीही नव्हतें जवळपास. त्या वेळेपर्यंत माझ्या वाट्यास लक्षांत घेण्यासारखा असा कोणत्याही प्रकारचा आजारीपणा आला नव्हता. आणि त्यादिवशीं तर माझी तब्येत एकदम ठिकठाक होती. असें असतां मला एकाएकीं मृत्यूचें भयंकर भय वाटूं लागलें ! त्या भयानें किती व्याकूळ झालों होतों मी !

असें एकाएकीं मला कां बरें वाटावें ? तब्येत तर ठीक होती. मीही याचें कारण काय असावें याच्या बारीक दृष्टीनें विचार करण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. 'मी आतां लौकरच मरणार ' असें मला वाटूं लागले हें मात्र खरें. या येऊं घातलेल्या मरणाला कसें तोंड द्यावयाचें याचा मी विचार करूं लागलों.

## हा प्रश्न मीच सोडविला पाहिजे

आपण एखाद्या डॉक्टरकडे जाऊन त्याबाबतींत त्याचा सल्ला घ्यावा असेंही मला वाटलें नाहीं. कां कोण जाणे ! निदान घरांतील वडील माणसें, मित्र सगसोयरे होते कीं नाहीं ? त्यांना तरी विचारायचें ? परंतु; छे तशीही बुद्धि मला झाली नाहीं. हा माझ्या मरणाचा प्रश्न आहे. तो माझा मीच सोडविला पाहिजे. आणि तोही तेथल्या तेथें अविलंबेकरून सोडविला पाहिजे.

. माणसाला मरणाचें भय फार वाटत असतें नाहीं का ? मनुष्य गांगरून जातो; बेभान होतो. त्याच क्षणीं मी अंतर्मुख झालों. माझ्या मनानें मरणाचा ताबा घेतला.

मन स्वतःशींच पुटपुटूं लागलें कीं, माझ्यावर मरण ओढवलें आहे. मी मरणाधीन झालों आहे. मरणें म्हणजे काय? मरण कशाला म्हणायचें? मरतें कोण? शरीर मरतें! तें आडवें पडतें. निश्चेष्ट होतें!

आणि मी मेल्यासारखा भूमीवर आडवा पडलोंही!

## जिवंतपणींचें मरण

माझे हातपाय लांबवर पसरले आहेत. श्वासोच्छ्वास बंद पडला आहे. सारे निश्चल थंडगार झालें आहे असें मला भासूं लागले. मी अगदीं प्रेतवत् पडून राहिलो.

तोंड बंद केलेलें, श्वासोच्छ्वास रोखून धरलेला अशा अवस्थेंत मी होतों. मुखावाटे 'मी' किंवा कोणताहि शब्द बाहेर पडण्याची शक्यता नव्हती.

मग मी स्वतःशींच म्हणालों, हें शरीर मेलेलें आहे. तें निजीव झालें आहे. तें आहे तसेंच स्मशानांत नेऊन दहन केलें जाईल! मागें त्याची राख तेवढी शिल्लक राहील! शरीर मेले; परंतु त्या शरीरांत वास्तव्य करणारा 'मी' आत्मा मरण पावला काय? शरीर म्हणजे 'मी' आहे का? तो 'मी' कोणाला दिसत नाहीं; परंतु कर्ता करविता तोच आहे. तेव्हां मी म्हणजे माझ्या शरिरांत वास्तव्य करणारा आत्मा. शरीर मरणाधीन आहे; आत्मा नाहीं. तो अमर आहे. त्या मीचें त्या आत्मारामाचें अस्तित्व मला भासूं लागलें. आंतून कोणी तरी माझ्याशीं बोलत आहे, असा मला भास होऊं लागला. शरीर निर्माल्यवत् होतें. तें मरण पावतें. परंतु अंतस्थ आत्म्याला कोणीही स्पर्श करूं शकत नाहीं. मृत्यू त्याच्या जवळपास फिरकूं शकत नाहीं. तेव्हां मी कोण? मी अमर आत्मा आहे.

## डोक्यांत प्रकाश पडला

कांहीं तरी मनांत कल्पना येऊन गेली असा हा प्रकार नव्हता. माझ्या डोक्यांत ही जी कल्पना एकाएकीं शिरली तिनें माझ्या डोक्यांत चक्क प्रकाश पाडिला. ती कल्पना उगाच नव्हती चमकली. त्यायोगें मला प्रत्यक्ष सत्याचें दर्शन घडावयाचें होतें. जी गोष्ट समजण्यासाठीं विचारचक्रातून दीर्घकाळ जावें लागतें तिची जाणीव मला एकाएकीं व समोरासमोर झाली होती.

मला 'मी' कोण हें समजलें. खरें कोणतें, सत्य कोणतें, शाश्वत कोणतें, अविनाशी कोणतें त्याची मला जाणीव झाली. माझ्या शरिराकडून जे नानाविध व्यापार घडतात त्याचा घडविणारा कोण हें समजलें.

त्याच क्षणापासून माझ्यांत क्रांति घडून आली. त्या आत्मतत्वावर माझें सारें लक्ष केंद्रित झालें. त्याच्याबद्दल मला विलक्षण आकर्षण वाटूं लागलें.

मृत्यूसंबंधीं भय म्हणून जें कांहीं असतें तें साफ लयाला गेलें. त्याचा लवलेशही शिल्लक राहिला नाहीं. आणि तें भय जें गेलें तें कायमचें गेलें. त्या क्षणापासून मी आत्मारामांत रंगून गेलों तो शेंवटपर्यंत.

# ईश्वरी कायदा पाळा

—अप्पाराव

या संसारांत राहून परमार्थ साधतां येतो. त्यासाठीं संन्यास-दीक्षा घ्यायला नको. परंतु संसारांत राहून कसे वागायचें ? ईश्वरी कायदा कसा पाळावयाचा हें समजून घेतलें पाहिजे. तें कठीण नाहीं. मात्र स्वार्थाला तिलांजली दिली पाहिजे. आणि स्वार्थ तरी कशासाठीं करायचा ? शेवटीं त्यापैकीं आपल्याबरोबर कांहीं तरी येतें कां ?

ईश्वर प्राप्तीसाठीं संन्यास घेऊन जंगलांत जाऊन राहिलें पाहिजे असें नाहीं. ज्याला स्वतःचा उद्धार करून घ्यावयाचा आहे त्याच्या पुढें दोन मार्ग असतात. त्यापैकीं एक निवृत्ति मार्ग व दुसरा प्रवृत्तिमार्ग. याचा थोडक्यांत भावार्थ असा—संसारांत राहून आपल्या कर्तव्यांचें पालन करून मनुष्य बंधनांत राहूनही बंधन मुक्त होऊं शकतो. याचें ढळढळीत प्राचीन कालीन उदाहरण म्हणजे जनक राजाचें. जनकाचा आदर्श हा एक फार मोठा आदर्श आहे. संन्यास घेऊन सर्व व्यापापासून सुटका करून घेतली म्हणजे निवृत्तिमार्ग झाला असें समजण्याचें कारण नाहीं. संन्यास म्हणजे सर्वांकडे पाठ फिरविणें; परंतु प्रवृत्ती मार्गांत असतांहि माणसाला निवृत्ति साधतां येते. संसारांत राहून आपली कर्तव्यें ईश्वराला स्मरून पार पाडीत असतांहि सन्यास धर्माचें पालन करतां येतें, परंतु संन्यास घेतल्यानंतर मात्र त्या माणसाने कांचन व कामिनी यांच्याशी जरासुद्धां संबंध ठेवणें अनिष्ट व पापकारी आहे.

### गृहस्थाश्रमाचें महत्त्व

आजकाल संन्यास धर्म पालन करणे अत्यंत कठीण आहे. गृहस्थाश्रमांत राहून सन्यास धर्म पाळतां येतो व आजच्या काळांत त्या धर्माचा म्हणजे प्रवृत्ति मार्गाचा स्वीकार करणे सोईस्कर आहे. गृहसंसार चालवीत असतां भगवंताची भक्ति करतां येत नाहीं का ? आपल्या कुटुंबांतील माणसांशीं व ज्यांच्याशीं संबंध येईल त्यांच्याशीं प्रेमानें व सेवाभावाने वागणें स्वार्थाला तिलांजली देऊन परोपकार हेंच ध्येय मानणें व अहर्निश त्याप्रमाणें वागणे, जो आपला व्यवसाय असेल तो इमाने ! इतबारें चालविणें व त्याच्याद्वारें इतरेजनांची सेवा करणें, या सान्या गोष्टी म्हणजे भगवंताची भक्तीच होय.

### कल्याणाचा मार्ग

प्रत्येक गोष्ट देवाचें नाव घेऊन त्याच्यासाठीं पार पडण्यासाठीं झटणें, हाच आपल्या कल्याणाचा मार्ग आहे.

येथें आपण एखादें उदाहरण घेऊन ही गोष्ट अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करूं या. समजा कीं एक व्यापारी–वैश्य आहे. तो नानाप्रकारचे, घरांत संसाराला नित्य लागणारे, जिन्नस विकतो. दरदामांत, वजनमापांत त्याला तोंडचलाखी व हातचलाखी करतां येण्याची शक्यता आहे. असेंच इतरहि अनेक व्यवसाय आहेत. तेव्हां ते व्यवसाय आपण सोडून द्यावयाचें काय ? सोडण्याची मुळींच जरूरी नाहीं. तो जिन्नस विकण्याचा व्यवसाय खरोखर उत्तम आहे. त्याच्याद्वारें तुम्ही भगवंताची प्राप्ति करूं शकतां ! कशी बरें ? तो व्यवसाय आपण कर्तव्य बुद्धीनें इमानें इतबारें करावयाचा. सर्वांशीं वागण्याचें धोरण सारखे. एकाबरोबर सचोटी, दुसऱ्याबरोबर अर्धसचोटी आणि तिसऱ्याबरोबर लबाडी. हें कामाचें नाहीं. व्यापारांत खोटेपणाला प्रामाणिकपणाला, लबाडीला कितीही वाव असला तरी आपण एकाही दुर्गुणाच्या आहारी जावयाचें नाहीं. हें माझें नव्हे भगवंताचें दुकान आहे. हें मी त्याच्यासाठीं चालवितों आहें. तो मालक आहे. मी त्याचा नोकर आहें. या व्यवसायाच्या रूपानें माणसांची सेवा करण्यासाठी मी येथें आहें. मला अन्नवस्त्र मिळत आहे. तेंच माझें वेतन. त्यावर राजी राहून मी अंगीकृत किंवा माझ्या वाट्यास आलेलें कार्य सेवाभावानें करीत रहावयाचें. त्यांतच माझा उद्धार आहे. माझ्या घरांत चार लहानमोठीं माणसें आहेत. मी त्यांच्याशीं कोणत्याना कोणत्या नात्यानें जोडला गेलों आहें. त्यांची सेवा ही भगवंताची सेवा, या भावनेनें त्यांच्याशीं वागणें, त्यांना सुख व आनंद देणें, हेंच माझे कर्तव्य, ही भावना जागृत झाली पाहिजे.

## ईश्वराचें सर्व व्यापित्व

अशा सेवाभावानें निर्मळ अंतःकरणानें तुम्हीं सर्वांशीं वागूं लागलां म्हणजे तुम्हांला तुमच्या उद्धाराचा मार्ग सांपडला असें म्हणायला हरकत नाहीं.

एका गोष्टीचें स्मरण जर आम्हांला सतत राहील तर आम्हीं सर्वस्व साध्य केलें असें म्हणता येईल. कोणती ती गोष्ट ? ईश्वर सर्वव्यापी आहे. सर्वांच्या अंतरंगांत त्याचें वास्तव्य आहे. ही भावना बाळगून सर्वांशीं प्रेमभावानें वागणें, निष्काम वृत्तीनें वागणें बंधूभावानें वागणें, निष्कपटपणें वागणें हाच इश्वर प्राप्तीचा मार्ग आहे. श्री साईबाबानीं आम्हांला याच महान् तत्वाची शिकवण परोपरीनें दिली. ती शिकवण अंमलांत आणणें, तिचें पालन करीत रहाणें, हाच आमच्या उद्धाराचा मार्ग आहे. कशाला पाहिजे आहे सन्यास ? हाच आहे मुळीं कर्मसन्यास !

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दन्ति मानवः ॥**

भगवंतानीं गीतेंत हेंच सांगितलें आहे. सर्व प्राणीमात्रांची उत्पत्ति परमेश्वरापासून झालेली आहे. तोच सर्वांना जन्म देणारा. त्यानें सर्व जग व्यापून टाकिलें आहे. त्याची आपआपल्या वर्णधर्मानुरसार आपलीं कामें इमानेइतबारें पार पाडून आपण पूजा

करावयाची आहे. ती पूजा होच त्याची सेवा. अशा सेवेनें, अशा पूजेनें मनुष्य परम सिद्धि प्राप्त करून घेत असतो. त्याला प्राप्त करून घेण्याचा हाच मार्ग आहे.

## सर्व भगवंताचीं रुपें

भगवान सर्वव्यापी आहे. याचा अर्थ सर्व भगवान स्वरूप, नारायण स्वरूप आहेत. भगवंत सर्वांत आहे. या भावनेनें आपण वागूं लागलों म्हणजे पाप करण्याकडे आपली प्रवृत्ति होणार नाहीं.

आपण व्यापार धंदा करीत आहोंत. त्या निमित्तानें नानाप्रकारचीं माणसें आपल्याकडे येतील. त्यांचें आपल्याकडे आगमन म्हणजे भगवंताचें आगमन. आणि त्या भगवत् भावनेनें आपण त्यांच्याशीं वागूं लागलों मग आणखी काय पाहिजे ? आपण तसे वागतों कां ?

## नीतीचें वागणें

आपल्याकडे आलेला इसम हा भगवंताचेंच एक स्वरूप आहे. ही भावना दृढ झाली म्हणजे त्याच्याशीं आपण कपटानें वागणार नाहीं प्रेमानें वागूं. आदरानें वागूं. निष्कपटपणें वागूं. बस् ; एवढेंच पाहिजे. हेंच न्यायाचें नीतीचें वागणें. ही नीति आम्हांला संभाळायला आली पाहिजे.

आम्ही एखाद्या सार्वजनिक संस्थेंत काम करीत असतों. विश्वासपूर्वक एखादी कामगिरी आपल्यावर सोपविलेली असते. तें कार्य एकप्रकारें जनसेवेचें असतें. जनसेवा म्हणजेच ईश्वरसेवा. परंतु त्या भावनेनें आम्हीं सोपविलेलें कार्य पार पाडण्यासाठीं झटत असतों का ! तेथेंहि स्वतःचा स्वार्थ आपण शोधींत असतों. मला फायदा कसा करून घेतां येईल याकडे जर आमची दृष्टी लागून राहिली तर आम्हीं आमची जबाबदारी पार पाडिली असें म्हणतां येईल का !

## आपलें स्थान शोभवा

अहो ? भगवानानें आपल्या सेवेची व तुमच्या उद्धाराची ही एक नामी संधी तुम्हाला दिलेली असते. जें स्थान स्वीकारलें असेल तें आपलें कर्तव्याचरण उत्तम प्रकारें पार पाडून शोभविणें हेंच आपलें कर्तव्य व होच ईशसेवा, परंतु तसें घडत असतें का आमच्या हातून ? तसें घडत नाहीं हेंच अत्यंत वाईट आहे.

होय; कधीं कधीं आपण मोहांत सांपडतों. पैशाशीं संबंध येणें म्हणजे मोहजालांत सांपडणें; परंतु क्षणोक्षणी मोहांत सांपडण्यासाठींच का आमचा जन्म आहे ? त्याचा प्रतिकार नको का करायला ? एकदां पाय घसरला तर विचार करून सावरायला नको ? बुडत्याचा पाय एकसारखा खोलांतच गेला पाहिजे ?

## आमची स्वार्थावर दृष्टि

परंतु आम्हांला आमच्या जबाबदारीची जाणीवच नाहीं. इकडून तिकडून सारें लक्ष स्वार्थावर ! आणि त्याचा शेवट काय व्हायचा ? कधीं तरी लबाड्या उघडकीस येऊन

तोंडघशी पडण्याची पाळी यावयाचीच; आहे तोंपर्यंत साधून घ्यायचें व चैन मारायची. पुढें काय होईल याची चिंता वहायची नाहीं. तेव्हां आरंभापासून सावधगिरीनें वागल्यास आपलें शाश्वत कल्याण नाहीं का साधणार ?

तेव्हां सर्वत्र पसरलेलें, सर्वांना व्यापून राहिलेलें परमात्म स्वरूप समजून घेऊन आपण निःस्वार्थपणें सेवाभावानें वागूं लागलें पाहिजे. जीवनसाफल्य त्यांत आहे हें आपण जाणलें पाहिजे.

ईश्वरी आज्ञा पालन करण्याकडे, भंग करण्याकडे नव्हे, आपलें लक्ष असावें. जो ईश्वरी कायद्याचा भंग करतो त्याला त्याचा भूदंड आज ना उद्यां भोगावा लागतो.

**जाणूनबुजून अज्ञान पांघरतों.**

ईश्वरी कायदा, ईश्वरी इच्छा कोणती हें प्रत्येकास समजत नाहीं असें नाहीं. तें समजतें परंतु जाणूनबुजून व स्वार्थांध होऊन आपण आपल्या डोक्यावर पडदा ओढून घेत असतों.

संत पुरुषांच्याद्वारें, सत् शास्त्राच्या द्वारें व शुद्ध अंतःकरणानें जे साधक या नात्यानें ईश्वरी मार्गांत असतात त्यांच्याद्वारें योग्य कोणतें अयोग्य कोणतें, ग्राह्य कोणतें, अग्राह्य कोणतें, आचरणीय कोणतें व अनाचरणीय कोणतें हें समजत असतें परंतु वर म्हटल्याप्रमाणें जाणूनबुजुन डोळ्यांवर पडदा ओढून घेणाऱ्यांबद्दल काय सांगावयाचें ?

---

## दुसऱ्यांचे दोष शोधूं नका !

दुसऱ्या लोकांची सुधारणा करण्यासाठीं झटण्याचा आपण जणूं काय विडा उचललेला असतो. मग करायचें काय ? दुसऱ्यांचे दोष शोधून काढायचे ! दोष तेवढे पहावयाचे व ते झिजवीत रहावयाचें. त्यांचें चिंतन करावयाचें. याचा परिणाम काय होतो माहीत आहे ? ते संस्कार रूपानें आपणालाच चिकटून बसतात. त्यांचा घर करून रहाण्याचा मार्ग आपोआप मोकळा होतो. आमच्यामध्यें कांहीं ना कांहीं दोष असतातच. त्यांना पुष्टि मिळते. ते बलवान् होतात. आपण आपल्या दोषांकडे सहसा पहात नाहीं. जणूं काय आपण निर्दोष आहोंत अशी आपली भावना असते. याचा परिणाम आपलें पतन होण्यांत निश्चितपणें होत असतो. तेव्हां काय ? दुसऱ्यांचे दोष शोधीत बसण्याऐवजी अगोदर स्वतःमधील दोषांचें संशोधन व पृथक्करण करण्यांत आपला शक्य तेवढा वेळ खर्च करावा.

---

# मी जगांत काय शिकलों ?

—स्वामी विवेकानंद

निरनिराळे देश, त्या त्या देशांतील धर्म चालीरीति व हवापाणी वगैरे पाहिल्याशिवाय आपल्या देशासंबंधीं बरोबर कल्पना कोणालाहि करतां येत नाहीं. ' केल्यानें देशाटन ' म्हटलें आहे तें उगाच नाहीं; परंतु देशपर्यटण करणारा माणूस डोळस असावा लागतो. त्याच्या-ठायीं सारासार विचारशक्ति असावी लागते. स्वामी विवेकानंद हे अशा थोर व्यक्तीपैकीं एक होते. त्यांनीं जगांतील अनेक प्रमुख देशांतून डोळसपणें प्रवास केला. इतरांस देण्यासारखें आपल्याजवळ जें कांहीं होतें तें त्यांनीं मुक्तहातांनीं दिलें व इतरां-कडून घेण्यासारखें जें जें म्हणून होतें त्याचा त्यांनी निःसंकोचपणें स्वीकार केला.

### माझी संपन्न मातृभूमि

ते म्हणतात, " जगांतील नाना देश पाहिले, अनेक ठिकाणीं राहिलों सवरलों व त्यामुळें माझ्या मातृभुमींत जीं कांहीं सौंदर्य स्थळें आहेत व ज्या कांहीं सुंदर गोष्टी आहेत त्यांचें महत्त्व माझ्या मनाला अधिकाधिक पटूं लागलें आहे.

जगांत कोणता धर्म श्रेष्ठ व सर्वांगपरिपूर्ण आहे याचेंहि मी कसून संशोधन केलें. निरनिराळ्या धर्मांचा अभ्यास केला, निरनिराळ्या धर्माभिमान्यांबरोबर वावरलों त्यांच्याशीं चर्चा केली; या देशांतहि ज्यांनीं परकीय धर्मांचें उद्दिष्ट आपल्यापुढें ठेविलें आहे, त्यांच्या सहवासांतही मी राहिलों. इतर धर्मियांकडून मला कांहीं घेतां येईल का, म्हणून शोध करूं लागलो ( कारण माझ्या धर्माचें सर्व श्रेष्ठत्व त्यावेळी मला पटले नव्हतें ) तेव्हां मला कळून आलें कीं माझ्या धर्मा सारखा उदार, सुंदर व वैभवसंपन्न दुसरा धर्म नाहीं.

### सर्वांगपूर्ण हिंदुधर्म

त्यानंतर माझी खात्री झाली कीं हिंदुधर्म हा कोणत्याही कसोटीला लावून पहातां सर्वांगपरिपूर्ण असा श्रेष्ठ धर्म आहे. जगांत या तोडीचा दुसरा धर्म नाहीं. आमच्या या मातृभूमींतील कांहीं लोकांवर यूरोपीयन विचारांचा व यूरोपीयन चाली रीतींचा व रहाणीचा पगडा बसलेला आहे. त्या संस्कृतीच्या आहारी ते गेले आहेत. आधिभौति-कतेच्या आहारी गेले आहेत. त्यांना स्वधर्मांत कांहीं तरी चुकलें आहे असे वाटते. परकीय

चष्मा लावून पहाण्याचा हा दुष्परिणाम आहे. ही परिस्थिति पाहून मला मोठें दुःख वाटतें. त्यांना असें कां वाटतें याची मला जाणीव आहे. आज आमच्यांत अशीं कांहीं माणसें आहेत कीं, जे स्वतःला सुधारणावादी समजतात; त्यांना आपल्या धर्मात् कांहीं सुधारणा घडवून आणाव्या असें वाटूं लागलें आहे. त्यांना हिंदुधर्म आमूलाग्र बदलला पाहिजे असें वाटते. त्यांत उलथापालथ घडवून आणणें जरूर आहे असें त्यांना वाटूं लागलें आहे.

**परक्यांचें तेवढें चांगलें**

अशा त्या सुधारणावादी लोकांत कांहीं सुविचारी माणसेंही आहेत; परंतु पुष्कळशीं माणसें अशीं आहेत कीं, जीं आंधळेपणानें, अविचारानें आपलीं पावलें टाकीत असतात. त्यांना आपण काय करीत आहोंत, याची मुळींच जाणीव नसते. त्यांना परकीयांचे तेवढें चांगले व अनुकरणीय वाटत असतें. ( सुमारें ७०।७५ वर्षांपूर्वीची ही स्थिति आहे ! ) ' मूर्तिपूजा ' त्यांना मानवत नाहीं. हिंदु धर्मातील ते एक मोठें व्यंग आहे असें वाटतें. त्या एका शब्दाला ते जबरदस्तपणें चिकटून राहिले आहेत. हिंदुधर्म मूर्तिपूजेचा पुरस्कार करणारा म्हणून तो सत्याच्या पायावर उभारलेला नाहीं असें त्यांचें म्हणणे. मूर्तिपूजा हें त्यांना थोतांड वाटतें. हो मूर्तिपूजा हें त्यांना थोतांड वाटतें. ही मूर्तिपूजा ' म्हणजे काय ती कशासाठीं कोणासाठीं व कुठवर आहे याचा ते कधींही विचार करीत नाहीं. जो धर्म मूर्तिपूजेचा पुरस्कार करणारा तो धर्म कसला ? असें त्यांचें म्हणणे. कांहीं एक विचार करायचा नाहीं. एक म्हणतो म्हणून दुसरा म्हणतो ! आणि खुशाल हिंदुधर्माला हीन लेखण्यास प्रवृत्त होतो !

आपल्यामध्यें दुसरा एक वर्ग आहे. ते प्रत्येक चालीरीतीला कांहीं ना कांहीं शास्त्रीय आधार दाखवितात. प्रत्येक चालीरीतीच्या मार्गे कांहीं ना कांहीं तत्व आहे असें त्यांचें म्हणणें.

**मी त्या वर्गापैकीं एक आहे**

याशिवाय आणखी एक बराच मोठा वर्ग आहे. ते म्हणतात तुमची बडबड ऐकून घेण्याची आमची तयारी नाहीं. तुमचा सुधारणावादीपणा आमच्या अंगावर कांटा उभा करतो. आम्हांला देव पाहिजे. त्याची भेट आम्हांला घ्यायचीं आहे. आम्हांला सत्–चित् आनंद प्राप्त करून घ्यायचा आहे. आम्हांला आत्मप्रचीतीची तहान लागली आहे. जेथें दुःख नाहीं आनंद नाहीं, कांहीं नाहीं. त्या सर्वांच्या पलीकडे आम्हांला जावयाचें आहे. आणि त्यांची अशीही श्रद्धा असतें कीं पवित्र गंगेंत स्नान केल्यानें मनुष्य पुण्यपावन होत असतो. त्यांना असेंही वाटत असतें कीं, राम, विष्णु, शिव अशा कोणत्याही रूपानें तुम्हीं श्रद्धाशील अंतःकरणानें त्याची भक्ति केली असतां तुम्हीं मोक्षाप्रत जाल. तुमची श्रद्धा मात्र तशीच जाज्वल्य असली पाहिजे. तुम्हीं त्याच्या सन्निध गेल्याशिवाय रहाणार नाहीं—अशा विचारांचा, असें मानणारा प्राचीन काळापासून जो एक वर्ग आहे, त्या वर्गापैकीं मी एक आहें असें सांगायला मला अभिमान वाटतो.

**जेथें राम तेथें काम असणार नाहीं**

जे देवत्त्वाप्रत पोहोंचले त्यांचा अनुभव काय आहे? ते काय बरें सांगतात? ते सांगतात कीं, जेथें राम आहे तेथें काम असूंच शकत नाहीं व जेथें काम आहे तेथें राम असूं शकत नाहीं. दिवस आणि रात्र हीं दोन्हीं एकत्र नांदूं शकत नाहींत. तसाच हा प्रकार आहे.

आमच्या प्राचीन काळीं होऊन गेलेल्या ऋषीमुनींनीं आम्हांला असें सांगून ठेविलें आहे कीं, तुम्हांला ईश्वर प्राप्ति व्हावी अशी ईच्छा आहे ना? मग तुम्हीं काम आणि कांचन यांचा त्याग केलाच पाहिजे. हा संसार असा आहे. तो पोकळ आहे. त्याला चिकटून राहून उपयोग नाहीं. त्यालाच चिकटून राहिलांत तर तुम्हीं देवत्त्वाप्रत केव्हांही जाऊं शकणार नाहीं. तुमचे सारे प्रयत्न निष्फळ ठरतील. तें तुमच्यानें शक्य नसलें तर तुम्हीं निर्बळ अहांत हें मान्य करा. परंतु ईशप्राप्तीच्या उच्च ध्येयाला गालबोट लावूं नका. भलत्यासलत्या गोष्टींना नसतें महत्त्व देऊं नका.

**मी काय शिकलों**

तुम्हांला जर अध्यात्माची, देवाची प्राप्ति करून घ्यायची असेल तर तुमच्या मनांत जो वेगवेगळ्या कल्पनांचा सांवळा गोंधळ माजून राहिला आहे त्यापासून आपली सुटका करुन घ्या. प्रामाणिक बना. सत्याबरोबर खेळखंडोबा करूं नका.

मी हिंदुधर्मांत जन्म घेऊन काय शिकलों? सांगूं का काय शिकलों तें? मी शिकलों—

> **दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रह हेतुकम्।**
> **मनुष्यत्वं, मुमुक्षुत्वं, महापुरुष संश्रयः ॥**

**तीन महान देणग्या**

या तीन महान् देणग्या आहेत. त्या नाहीं येत सर्वांच्या वाट्याला. ज्याच्यावर ईश्वरी कृपेचा वरदहस्त आहे त्यांच्याच वाट्याला त्या येत असतात. कोणत्या त्या तीन गोष्टी? मनुष्य जन्म, मोक्षाची इच्छा, आणि सत्संगती लाभ.

मनुष्यत्व उगाच नाहीं वाट्याला येत. तें वाट्याला येणें हें महत् भाग्य होय. मुक्ति मिळविण्याचें एकमेव साधन म्हणजे मनुष्य जन्म. या जन्मांतच मोक्ष प्राप्तीची तयारी करतां येते; म्हणून मनुष्य जन्म श्रेष्ठ; परंतु आपण माणुसकीनें माणसासारखें वागलें पाहिजे.

मुमुक्षुत्त्व याचा अर्थ तरी काय? मोक्षाची, ईश्वर प्राप्तीची दांडगी इच्छा. या संसारांतील सुखदुःखापलिकडे जाण्याची महदाकांक्षा. सभोंवारच्या जगाबद्दल नावड, अप्रीति. मला देवाची भेट झालीच पाहिजे अशी जाज्वल्य तृष्णा अंतःकरणांत जागी झाली पाहिजे, तीच तुम्हांला ईश्वराप्रत घेऊन जाण्यास समर्थ असते.

**संत संग देई सदा**

आतां तिसरी महत्त्वाची गोष्ट राहिली. ती म्हणजे संतसंग. त्याशिवाय आम्हांला आमचा मार्ग समजत नाहीं. महापुरुषांच्या सहवासांत आल्यानें त्या मार्गाचा उकल

होऊं लागतो. ज्यानीं तें उच्चतम ध्येय गांठलें आहे ते महापुरुषच आम्हांला योग्य मार्गानें नेऊं शकतील.

संसाराबद्दल किंवा सभोंवारच्या जगाबद्दल केवळ वीट येऊन भागत नाहीं. तो आल्यानंतर पुढें कोणत्या मार्गानें जावयाचें याचें मार्गदर्शन करणाऱ्या वाटाड्याची दुनुभुला अत्यंत जरूरी असते.

असें कां बरें ? ती एक महान् शक्ति आहे. त्या शक्तीचें वर्णन करतां येणार नाहीं. ती परंपरेनें चालत आहे. जे भाग्यवंत व ईश्वराचे लाडके होऊन राहिलेले असतात, त्यांच्याच वाट्याला ती येते.

यासाठीं भक्तानें, मोक्षाची वाट चालू इच्छिणाऱ्यानें अशा गुरूच्या शोधांत असलें पाहिजे. तो शोधून काढिला पाहिजे. त्याच्यावर श्रद्धा ठेविली पाहिजे. तो दाखवून देईल त्या मार्गानें वाटचाल करूं लागलें पाहिजे. गुरुशिवाय तरणोपाय नाहीं.

अध्यात्माकडे ज्याला जायचें आहे. त्याला गुरुशिवाय तरणोपाय नाहीं. परंतु गुरु कोणाला मानायचें ? वाटाड्या या नात्यानें कोणाकडे वळायचें ?

**श्रोत्रियोऽवृजिनोऽकाम हतो यो ब्रह्मवित्तम :**

जो वेदशास्त्रपारंगत आहे, ज्याच्यावर कसलाही रंग चढलेला नाहीं, जो निर्लोभ निरहंकारी आहे व ज्यानें ब्रह्मतत्व जाणलें आहे, अशा महापुरुषाकडे आपण गेलें पाहिजे.

श्रोत्रिय अर्थात् वेदशास्त्रपारंगत, एवढेंच नव्हे तर ज्यानें शास्त्राचें जीवनांतील महत्त्व व त्यांचें मर्म जाणलें आहे तो. मनुष्यानें अनेक शास्त्रांचें पारायण केलें असेल, ती केवळ पोपटपंची काय कामाची ? तो खराखुरा मर्मज्ञ व पंडीत असला पाहिजे. ज्याच्या ठिकाणीं संपूर्ण श्रद्धा आहे, अपरंपार प्रेम आहे, मानव जातीबद्दल अपार तळमळ आहे, जो घेण्याऐवजी आपल्यापाशीं जें असेल तें जगाच्या कल्याणासाठीं देण्यास घडपडतो तो ज्ञानी होय. अशा ज्ञानी पुरुषाच्या सहवासांत मुमुक्षूनें यावें, त्यांत त्याचें कल्याण आहे.

अशा महापुरुषाच्या सहवासांत आल्यानें आपला मार्ग मोकळा व सुलभ होतो. आणि त्यानंतर ईश्वरी साक्षात्काराच्या मार्गानें आपलीं पावलें पडूं लागतात.

गुरुजीनें एकदां मार्गदर्शन केलें, कोणत्या मार्गानें कसें जायचें हें सांगितलें तरी पुढचें कार्य आपल्याठायीं असतें, ज्या सत्याकडे, सच्चिदानंदाकडे जावयाचें त्याच्यासाठीं दीर्घ सतत व श्रद्धापूर्वक अभ्यासाची जरुरी असते. तो अभ्यास गुरुजीनें नव्हे तर आपण करावयाचा असतो. तो चिकाटीपूर्वक व भक्ति भावपूर्वक करावयाचा असतो. तुम्हीं अभ्यासांत भर घालावयाची असते ती भर सतत घालीत गेलें पाहिजे आणि चिकाटीपूर्वक तुमचा हा उपक्रम चालू राहिला म्हणजे एके दिवशीं तुमची व भगवंताची भेट झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हिंदुधर्मांत त्या प्रामव्याचा मार्ग दाखवून देण्यांत आला आहे. गुरूच्या सहाय्याने तो आत्मसात् करावयाला हेंच मनुष्य जन्माला येऊन तुमचें आद्य कर्तव्य आहे. माझ्या हिंदुधर्मानें मला हेंच शिकविलें.

---

# श्रीगुरुग्रंथांतील नामदेवाची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु काविटकर**, एम्. ए.

: ११ :

**का**तड्यानें मढाविल्याशिवाय बुद्धीरूपी मृदंग वाजत आहे. श्रावण महिना नसतांनाहि मेघ गर्जना करीत आहे. मेघाशिवाय वर्षाव होत आहे. ज्या कारणामुळें या घटना घडत असतात, त्याच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचा कोणी विचार केला काय ? मला प्रेममय प्रभु रामचंद्राचें दर्शन झालें ! त्याच्या दर्शनानें माझा देह सुंदर व दोषरहित झाला !! परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें व्हावें त्याप्रमाणें माझी अवस्था झाली. वाचेनें व मनानें भगवन्नाम रत्नांची माला मी गुंफित असतों. त्यायोगें मला आत्मवस्तूची जाणीव झाली. संसाराची भ्रांति व भय नाहींसें झालें. श्रीसद्गुरूंना प्रश्न पुसतांच माझ्या मनाचें समाधान झालें. पाण्यांत टाकलेला कुंभ जसा आंत बाहेर पाण्यानें व्यापलेला असतो त्याप्रमाणें एक परमेश्वर सर्व विश्व अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे. याची मला खात्री पटली. भक्तजनहो ! श्रीसद्गुरुकृपेनें गुरु-शिष्यांची अंतःकरणें एक झाली आणि नामदेवांना परतत्वाचें ज्ञान झालें.

: १२ :

जनहो ! घराचा पाया खोल खणून त्यावर आच्छादनासाठीं इमारत बांधीत आहांत; परंतु तुम्हांला ठाऊक नाहीं कीं दीर्घायुषी मार्कंडेय ऋषी हा तर आच्छादनाकरिता डोक्यावर गवताचा भारा घेऊन राहात असे. विश्वनिर्माता प्रभु रामराय हीच एक माझी प्रिय वस्तु आहे. नाश पावणाऱ्या या देहाचा व घरादाराचा एवढा अभिमान कशाला ? कौरव दुर्योधन आणि त्यांचे भाईबंद म्हणतात कीं हें सर्व माझें आहे. त्यांच्या राज्याचा विस्तार बारा योजनें होता. पण शेवटीं त्यांचे देह गिधाडांनीं खाऊन टाकले. सर्व लंका सोन्याची होती. रावणापेक्षां अधिक श्रेष्ठ कोण होता ? त्याच्या दारांत बांधलेले हत्ती, घोडे, पालख्या इत्यादि वैभवाचें काय झालें ? एका क्षणांत ती संपत्ति दुसऱ्याची झाली. दुर्वासाला यादवांनीं फसविलें. त्याचा परिणाम काय झाला ? परमेश्वर सर्वांवर कृपा करणारा आहे. नामदेव म्हणतात, मी त्याचें गुणगान करतों.

: १३ :

मी दहा इंद्रियें ताब्यांत ठेवलीं, पांच मनोविकार नाहींसे केले. आणि हृदयांतील बाहात्तर तळ्यांतील विष काढून त्यांत अमृत भरून ठेवलें. तें विष मी पुन्हां या देहांत प्रवेश होऊं देणार नाहीं. हृदयांत अमृतरूपी ईश्वरनामाचा उच्चार करून मी आत्म्याची समजूत घालीत आहे. पायाशीं लागलेले मायामोह वज्र कुठारीनें तोडून टाकले. ते पुन्हां उठाव करील या भीतीनें मी संतांचा आणि भगवद्भक्तांचा

सेवक झालों ! या मायेंत गुरफटून गेलों नाहीं तरच माझी संसारचक्रांतून सुटका होईल. गर्भावस्थेस घालते ती माया. तिचा त्याग केल्यानेंच ईश्वरदर्शन होईल. अशा प्रकारची जो भक्ति करतो तो सर्व भयापासून मुक्त होतो. नामदेव म्हणतात, बाहेर भटकण्यांत काय अर्थ आहे? आत्मसंयमन करा, म्हणजे तुम्हाला श्रीहरि प्राप्त होईल.

: १४ :

मारवाड देशांत जसें पाणी प्रिय, उंटाला जशी वेली प्रिय, शिकारी जनावरांना रात्रीचा आवाज प्रिय तसा माझ्या मनाला प्रभु राम प्रिय वाटतो. हे रामराया ! तुझें नाम सुंदर आहे, तुझें रूप सुंदर आहे आणि तुझा वर्णहि सुंदर आहे. पृथ्वीला जसा पाऊस, भृंगांना पुष्पगंध किंवा कोकिळेला आम्रवृक्ष तसा माझ्या मनाला प्रभु राम प्रिय वाटतो. चक्रवाक पक्षाला जसा सूर्य, हंसाला मानस सरोवर अथवा तरुण स्त्रीला तिचा पति तसा माझ्या मनाला प्रभु राम प्रिय वाटतो. लहान बालकाला जसें दूध, चातकमुखाला स्वाती नक्षत्रांतील मेघधारा किंवा माशाला पाणी प्रिय असतें, तसा माझा राम मला प्रिय वाटतो. साधक, सिद्ध आणि मुनिजन हे सर्व ईश्वर दर्शनाची इच्छा करतात; परंतु तो क्वचित्च एखाद्याला भेटतो. विठ्ठला ! तुझें नाम सर्व जगाला प्रिय आहे. तसेंच तें नामदेवाच्या मनालाहि प्रिय आहे.

: १५ :

प्रथम कमल-पुष्परूपी नगरी निर्माण झाली. त्यापासून चैतन्य आणि चैतन्या पासून मानव-प्राणी झाले. श्रीकृष्णाला जाणावें, त्याची प्राप्ति व्हावी म्हणून हरि हरि नामोच्चार करीत (भक्तजन) नृत्य करतात. ईश्वरापासून प्रथम ध्वनि, ध्वनीपासून माया व ब्रह्म यांच्या संयोगानें जग जन्माला आलें. हरीचे भक्त सागराप्रमाणें विशाल असलेल्या पृथ्वीवर नाचतात. गोपी नाचतात. लोक नाचतात. नद्या, स्त्रिया व कुमारी नाचतात. या नाचण्याचा, या भ्रमणाचा तर्क करतां येत नाहीं. या भ्रमणापासून मी बचावून आलों आहें. माया एक असली तरी अन्य जीवांच्या आधारें तिनें संसार उभा केला. देवा तुमच्या दाराशीं मी भटकत भटकत आलों आहे. देवानें विचारलें: कोण रे तूं? मी म्हणालों, मी नामा, ! मृत्यु निवारणासाठीं आलों आहें.

---

दुसऱ्यांना सुखसमाधान होईल असें ज्यांचे आचार विचार असतात ते सज्जन होत व दुसऱ्यांना दुःख होईल अशा रीतीनें वागणारे ते दुर्जन होत. सज्जनांच्या सहवासा-मुळें आपल्यावर चांगले संस्कार होतात व दुर्जनांच्या सहवासामुळें आपण वाईट संस्कारांच्या जाळ्यांत अडकले जात असतों. यासाठीं आपण नेहमीं सज्जनांच्या सहवासांत यावें व दुर्जनांचा सहवास कटाक्षेंकरून टाळावा.

---

# अंतर्मुख व्हा !

**आपण जें सभोंवार व वरवर पहातों तें खरें जग नव्हे. तें दिशाभूल करणारें खोटें जग. तुम्हीं विचारी बना. विचारी-दृष्टीचा, अंतर–दृष्टीचा चष्मा लावा आणि मग पहा; सारी उलथापालथ झालेली तुम्हांला आढळून येईल.**

बाहेरचें जग सर्वांना पहातां येतें. पशुपक्षीही बाहेरचें जग पाहूं शकतात, मग मानवाचें काय ? परंतु बाहेरच्या जगाशिवाय साध्यासुध्या दृष्टीला न दिसणारें दुसरें दृष्टिआड दडून राहिलेलें एक जग आहे. तें पशुपक्षांच्या आटोक्यांत नाहीं; फक्त मानवालाच तें जग पहाण्याची अंतरदृष्टि ईश्वरानें बहाल केली आहे. त्या दृष्टीच्या सहाय्यानें मनुष्य आंतलें जग पाहूं शकतो. ती दृष्टि म्हणजे विचाराची दिव्य दृष्टि. माणसाला ईश्वरानें विचारशक्ति दिली आहे. तिच्या सहाय्यानें तो अंतरसृष्टि पाहूं शकतो. तिच्यांत विहार करूं शकतो. बाहेर दिसणाऱ्या जगापेक्षां त्या दृष्टिआड असलेलें जग वेगळें आहे. तें जग पहाण्याची ताकद नसतें.

या जगांत आपल्या सभोंवार अशा कितीतरी वस्तु आहेत कीं, ज्या बाह्य दर्शनी अत्यंत सुंदर दिसतात, परंतु 'अंदरकी बात राम जाने।' बाहेर नयन मनोहर दिसणाऱ्या किती तरी वस्तु आंत निरखून पहातां अत्यंत गलिच्छ व न पहाण्यासारख्या असतात. त्याचप्रमाणें अशा किती तरी तरी वस्तु जगांत आहेत कीं, ज्या बाहेरून पहातां बेढब, घाणेरड्या असतात; परंतु आंत प्रवेश करून पहातां फार सुंदर असतात. फार कशाला ? एखादी वारांगना–वेश्या पहाना ! बाहेरून वर वर पहाता ती किती नयन मनोहर व रूपसुंदर दिसते बरें ! आणि एखादी घरंदाज व पतिव्रता स्त्री वरून पहातां तुम्हांला सुंदर व आकर्षक दिसणार नाहीं. परंतु दोघांच्या मनःस्थितींत, वागणुकींत नीतीमध्यें केवढा फरक ! तो शब्दांनी वर्णनही करतां येणार नाहीं हा फरक कोणाला दिसणार ? जो अंतरदृष्टीनें पाहिले त्याला बाह्यनेमावर वरचे बाहेर पडद्या आड नसलेलेही पाहूं शकतात ही अंतरदृष्टि सर्वांनाच आलेली नसते जीं माणसे विचारी असतात त्यांनाच ती दृष्टि प्राप्त होते. ज्याला अंतरदृष्टि प्राप्त झाली तोच खरा मानव होय.

बाह्य दृष्टीला सुखोपभोग दिसतात. भोग तेवढे दिसतात. अंतरदृष्टि म्हणजे योगदृष्टि. ती माणसांनीं मिळविली पाहिजे. ती उगाच आणि सहजासहजीं मिळूं शकत नाहीं. कोणत्याही प्रकारचें सुख असो वा दुःख असो. त्याचें जें बाह्य कारण आपणांस दिसतें,त्यापेक्षां त्याचें दृष्टिआड असलेलें कारण फार वेगळें असतें. तें विचारदृष्टीनें पहावें लागतें. आपल्याजवळची धनदौलत गमावून बसण्याची पाळी आली असतां दुःख होतें.

त्याचें कारण संपत्ति नाहींशी होणें; परंतु खोलवर विचार करून पाहातां त्याचें खरें कारण असतें लोभ हेंच. आपल्या अधिकारावर कोणी आक्रमण केलें असतां मोठा अपमान दुःख, सहन करावें लागतें. खोलवर विचार केला असतां त्याचें कारण अहंकार हें असतें.

एखादी व्यक्ति बाहेरून पाहातां मान सुखोपभोग व प्रेमभाव याबाबतींत सुसंपन्न व सुखी दिसत असते परंतु अंतर दृष्टीनें पहातां त्या साऱ्या गोष्टी दुःखाप्रत नेणाऱ्या व दुःखपर्यवसायी असल्याचें दिसून येईल. एखादी व्यक्ति बाहेरून सुख व दुःखभोगांपासून अलिप्त असलेली, दुःखानें जीवन कंठणारी दिसते, परंतु तीच व्यक्ति दुःखभोगांपासून अलिप्त, सुखदुःखाच्या बंधनापलीकडे गेलेली व सदासर्वकाळ आनंदांत रममाण होणारी असल्याचे आढळून येईल. कोणाला ? जो अंतःचक्षूंनी पाहील त्याला.

कधीं कधीं आमच्यावर दुःखांचा डोंगर कोसळत असतो. त्याचे कारण काय! आमचें नशीब, आमचें कर्म किंवा ईश्वर असें आपण समजतों; परंतु विचारी मनानें अंतर दृष्टीने पहातां त्याचें कारण आपल्या अंगी जे दोष असतात–मग तो मोह असो लोभ असो अथवा अभिमान असो.

बाहेरून संसारांतील ज्या व्यक्ति किंवा वस्तु आपण आपल्या असें मानतों त्याच अंतर मनानें पाहिलें असतां आपलें कोणी नाहीं असें आढळून येईल. बाहेरून अतीव सुंदर दिसणारा देह आंतून पहातां हाडें, मांस, रक्त कफ वगैरे अदर्शनीय वस्तूंनीं व्यापलेला दिसून येईल. नानाप्रकारचे सुखोपभोग वर वर्णी आनंददायक दिसतात; परंतु विचार दृष्टीनें पहातां तेच आपल्या दुःखाला कारणीभूत होणारे असतात.

आपण आपल्या सभोंवार पहातों तेव्हां असंख्य प्राणिमात्र सर्वत्र पसरलेले दिसून येतात; परंतु अंतर दृष्टीनें पहातां या सर्व प्राणिमात्रांना व्यापून राहिलेला परमात्मा एकच आहे असें आढळून येतें. एकच सच्चिदानंद सर्वांना व्यापून राहिला आहे याची प्रचीति येते.

आकृतींत प्रकृति; प्रकृतींत तिचा कर्ता–आत्माराम हें विचार दृष्टीला समजतें.

बाहेर सर्वत्र आपण जग पहातों. अंतरदृष्टीनें आपण विश्वाचा आधार जो परमेश्वर तो पाहूं शकतो. बाहेर साकार तर आंत निराकार, बाहेर सुखदुःखांचें द्वंद्व चालू आहे; आंत द्वंद्वातीत असा अखंड आनंद. बाहेर दिसणारे तें असत्य अशाश्वत; आंत सत्य व शाश्वताचें दर्शन घडतें. बाहेर दिसतो तो विनाशी देह; आणि आंत अविनाशी आत्मा.

यासाठीं वरवरचें पाहून तेवढ्यावर समाधान मानून राहूं नका. कारण जसें दिसतें तसें नसतें. विचारामुळें प्राप्त होणारी अंतर दृष्टि आपलीशी करा. तिची जोपासना करा. अंतर्मुख व्हायला शिका. त्यामुळें तुम्हांला आपलें ध्येय गांठतां येईल.

---

# जगन्मातेला अंतःकरणापासून आळवा

श्री रामकृष्ण परमहंस यांच्या मुखावाटे बाहेर पडलेलीं अनुभवसिद्ध बोधवचनें आणि श्री. राजगोपाला चारी ( स्वतंत्र भारताचे पहिले अध्यक्ष ) यांनीं त्याच्यावर चढविलेला सुंदर साजशृंगार प्रत्येक भक्ताला व साधकाला मार्गदर्शक होऊन राहील या उद्देशानें त्या उपनिषदतुल्य बोधवचनांचें आम्हीं क्रमशः प्रकाशन सुरू ठेविलें आहे.

—संपादक

## मायेच्या जाळ्यांतून सुटका

मनुष्य मायामोहाच्या जंजाळांत सांपडला म्हणजे त्या जाळ्यांतून सुटका करून घेणें फार कठीण आहे. या मायेची आणि आपली ताटातूट करणे बरें होईल ?' एका साधकानें श्री रामकृष्ण परमहंस यांस प्रश्न विचारला. मायेच्या जाळ्यांतून सुटका करून घेण्याची ज्वलंत व जाज्वल्य इच्छा तुमच्या मनांत उत्पन्न झाली म्हणजे ईश्वर त्या जाळ्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग तुम्हांला दाखवील. तशी जाज्वल्य इच्छा मात्र मनांत उत्पन्न झाली पाहिजे. इच्छा होणें म्हणजे काय ? मनांत इच्छा येऊन तिचा काय उपयोग ? तुमचें अंतःकरण उसळून निघालें पाहिजे. अंतःकरणांत खळबळ निर्माण झाली पाहिजे. बायको नसली किंवा जवळ पैसा–अडका नसला म्हणजे जीव कसा कासावीस होतो नाहीं का ? अगदीं तसाच जीव व्याकुळ झाला पाहिजे. बायकोसाठीं, पैशांसाठीं आम्हीं व्याकुळ होऊन रडतों परंतु भगवंताच्या भेटीसाठीं आपण होतों का तसे व्याकुळ ?

## आई व बाळाचें रडणें

लहान मूल आनंदानें आपल्या हातांतील खेळांशीं खेळत असतें व त्या दरम्यान आई स्वयंपाक घरांतील आपलें कामकाज उरकीत असते. कांहीं वेळानें तें मूल खेळाला कंटाळतें व ओक्साबोक्सी रडूं लागतें. आई तात्काळ हातांतील काम तसेंच बाजूला ठेऊन त्या रडणाऱ्या मुलाकडे धांव घेते. त्या घाईंत आपल्या हातांतील भांडें खालीं पडून त्यांतील वस्तु नासधूस होईल याची ती पर्वा करीत नाहीं. त्याचप्रमाणें अंतःकरणापासून टाहो फोडणाऱ्या आपल्या खऱ्या भक्ताकडे जगन्माता कशाचाहि विचार न करतां धांव ठोकते.

## देहदंडाची जरूरी नाहीं

या कलियुगांत भयंकर स्वरूपाचा देहदंड पत्करला पाहिजे असें मुळींच नाहीं. अंतःकरण पूर्वक व मनोभावें सतत तीन दिवस जरी तुम्हीं भगवंताचें ध्यान केलें तरी

पुरेसें आहे. जगन्माता आपल्या कृपेची पाखर त्या भक्तिभावाला वश होऊन तुमच्यावर घातल्याशिवाय रहाणार नाहीं. हें सांगत आहे, याची खूणगांठ बांधून ठेवा. यामध्यें असत्याचा अंश जरासुद्धां नाहीं. माझ्या बाळा, तिची प्राप्ति व्हावी अशी तुझी मनापासून इच्छा आहे ना? मग सतत तीन दिवस, सारें विसरून तिच्या भेटीसाठीं अविश्रांत धडपड कर. बेचैन हो. मग पहा तुला यश मिळतें कीं नाहीं तें! यश मिळालेंच पाहिजे. अंतःकरणांपासून जगन्मातेची प्रार्थना कर. सतत तीन दिवस तुला दुसरें तिसरें कांहींही सुचतां कामा नये. एकाच विचारानें अंतःकरण फुलून जाऊं दे आणि अंतःकरणापासून शब्द बाहेर पडूं दे कीं, 'हे जगन्माते! मला निर्मळ भक्तिभाव दे, माझें मन निःशंक व निःस्वार्थ कर. मला तुझा केव्हांही विसर पडणार नाहीं असें कर. माझ्या ठिकाणीं जो कांहीं पापांचा मळ साचला असेल तो साफ धुवून मला मोकळा कर.'

## प्रार्थनेचें फळ

अंतःकरणापासून केलेल्या या प्रार्थनेचें फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं अंतःकरणापासून केलेली प्रार्थना केंव्हांही वांया जात नाहीं. तिचें फळ पदरांत पडलेंच पाहिजे. काय? शंका वाटते का? मग माझ्याकडे पहा. मी त्याच मार्गानें गेलों आणि त्यांत विजयी झालों. हा माझ्या अनुभवाचा तोडगा आहे, वायफळ बडबड नव्हे! माझें हें उदाहरण तुझ्या मनांत विश्वास जागृत करायला कां बरं कारणीभूत होऊं नये?" भगवान् रामकृष्ण तळमळीनें बोलत होते.

मूल आईला म्हणत असतें कीं, "आई मी आतां झोंपतों. मला भूक लागली म्हणजे मला उठव बरं!

परंतु आईला माहीत असतें कीं भूक लागली म्हणजे मूल आपोआप जागें होऊन बसेल, असें आई स्वतःशीं म्हणत असते.

## लोकनाट्यापासून धडा

जेव्हां देवाला भेटण्याची भूक तुमच्या अंतःकरणांत जागी होते तेव्हां तुम्हांला कोणीही जागवायला नको; तसेंच कोणी येऊन तुमचें मार्गदर्शनही करायला नको. रस्त्यावरून लोकनाट्याचे प्रयोग किंवा खेळ होत असतात, त्यावेळीं या गोष्टीची आपणास नाहीं का प्रचीति येत? "कृष्णा! झडकरी ये पाहूं आणि जमलेल्या लोकांना दर्शन दे पाहूं. अशा अर्थाची गाणीं म्हणत व वाद्यें वाजवीत लोक बसलेले असतात; परंतु नाटकांतील कृष्ण पडद्या आड कोणाशीं तरी गप्पा मारीत व खाद्यपेयांवर खुशाल हात मारीत असतो. नंतर एकाएकी सामसूम होतें. हातीं वीणा घेऊन नारदमुनींची स्वारी "कृष्णा धांव रे झडकरी" असें गोड गीत गात स्टेजवर येतो. आणि मग कृष्ण लगबगीनें येऊन स्टेजवर सर्वांपुढें उभें राहातो.

# देवाचें दयाळुत्व

**तुम्हीं कसल्यातरी चिंतेंत असतां. कसें बाहेर पडावें हें सुचत नाहीं, परंतु ईश्वरावर तुमची श्रद्धा असली तर तो तुमची काळजी हां हां म्हणतां दूर करतो. त्याच्या दयेला अंतपार नसतो. तोच तुमची काळजी क्षणार्धात दूर करतो.**

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कलकत्यांत सर कैलासनाथ बोस या नांवाचे एक नामांकित डॉक्टर रहात असत. त्यांची मातोश्री वयोवृद्ध व फार आजारी होती. मातेचा आजार वाढत चालला तसतशी डॉक्टरसाहेबांची चिंता वाढूं लागली. ते डॉक्टर असले तरी त्या स्थितीत गांगरून गेले. आजार इतका वाढला कीं मातेचें कधीं प्राणोत्क्रमण होईल याचा नेम नाहीं अशी चिंता वाटूं लागली. आपल्या आईची कांहीं अंतिम इच्छा असल्यास ती समजून घ्यावी असें त्यांना वाटूं लागलें. त्या मनस्थितींत मनाचा हिय्या करून त्यांनीं तिला विचारलें, "आई! तुझी इच्छा कांहीं खाण्यासवरण्याची किंवा दुसरी कांहीं इच्छा असल्यास सांगा. ती पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करीन."

### अंजीर खाण्याची इच्छा

मातेला कांहीं सुचेना. तिला कांहीं कमी नव्हतें. थोडा वेळ विचार करून मुलास कांहीं तरी सांगितलें पाहिजे एवढ्यासाठीं ती म्हणाली, "बाळा! माझ्यासाठीं कांहीं करायचें तूं ठेविलें नाहींस. थोडयाच दिवसांपूर्वी तूं मला मुंबईचे अंजीर दिले होतेस. आठवतें का तुला? तसले अंजीर मला खावेसे वाटतात; पहा मिळाले तर!"

बंगालमध्यें अंजीर होत नाहींत. अंजीराचीं पार्सलें यायचीं बाजारांत तीं मुंबईहून. तो हंगाम नसल्यामुळें त्या दिवसांत कलकत्याच्या फळबाजारांत अंजीर येत नव्हते. कैलासबाबूंनीं मणसें पाठवून ताबडतोब तपास करविला. पत्ता लागेना. मुंबईहून मागवायचे तर आगगाडीनें पार्सल यायला तीन दिवस लागायचे. त्याकाळीं विमान वाहतूक सुरू झालेली नव्हती.

---

### जगन्मातेला अंतःकरणापासून हांक

भक्तिभावाचा देखावा किंवा नसती आरडाओरड येथें काय कामाची? जे आपले खरेखुरे भक्त आहेत त्यांच्याच हांकेला देव ओ देऊन धांवत येतो. साध्यासुध्या व अज्ञ लोकांनाही हें समजावें यासाठीं लोकनाट्यें असतात; ती केवळ पाहून काय उपयोग? त्यांच्यापासून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे.

'हे भगवंता! हे परमेशा!!' असे वरवरचे शब्दोच्चार काय कामाचे? ते ओठा-वरचे ओठावर रहायचे. जेव्हां अंतःकरण भक्तिभावानें बहरून जातें तेव्हां ओठाला कुलूप ठोकलें जातें. जगन्माता अंतःकरणापासून निघालेल्या आर्त हांकेकडे लक्ष देते. खऱ्या भक्तीची हांक तिला समजते. अशाच हांकेसरशी ती धांवत येते व भक्ताजवळ बसून त्याची मनकामना पूर्ण करतो.

---

**कैलासबाबूंची चिंता**

कैलासबाबू फार दुःखी कष्टी झाले. आपल्या आईनें अखेरच्या घटकेला एखादी वस्तु मागावी आणि ती तिची इच्छा आपणास पूर्ण करतां येऊं नये ही किती दुःखदायक गोष्ट आहे! ते अत्यंत बेचैन झाले. काय करावें हें सुचेना. वाटेल तेवढे रुपये देण्याची त्यांची तयारी होती; परंतु बाजारांत जेथें ती वस्तु मिळत नाहीं तेथें रुपयांची काय कथा? एखाद्या मुंबईच्या व्यापाऱ्यास तार करून अंजीर मागविले तरी ते हातीं येईपर्यंत तीन दिवसांचा कालावधि जाणार हें निश्चित होतें. परंतु कैलास-बाबूंना आपली माता तीन दिवस जिवंत राहील अशी शाश्वति किंवा खात्री कुठें होती? ती आतां कांहीं तासांची सोबतीण आहे असे त्यांना वाटूं लागलें होतें.

घटकामागून घटका जात होत्या. कैलासबाबू ईशचिंतन करीत होते. त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले होते. ते म्हणत होते, 'हे भगवान्! किती मी अभागी! माझ्या आईची अंतिम इच्छा, पुरविल्याचें समाधान माझ्या मनाला मिळूं नये! अरेरे! त्यापेक्षां माझ्यावर यमराजाची कृपा कां होत नाहीं!'

**एक महनीय योगायोग**

रात्रीचे अकरा वाजण्याचा सुमार झालेला होता. कोणी तरी दरवाजा ठोठावला. तशा वेळीं आणखी कोण येणार? कोणा तरी आजारी माणसाचा नातलग! डॉक्टरला घेऊन जाण्यासाठीं आलेला असणार! आणि डॉक्टर कैलासबाबू तर चिंतामग्न स्थितींत व निराशेनें हातपाय गाळून बसलेले! बसल्या जागेवरून ते ओरडले कीं, "अशा अवेळीं मी येऊं शकत नाहीं. मला यावेळीं त्रास देऊं नका!"

"नाहीं हो नाहीं! मी तुम्हांला बोलवायला नाहीं आलोंय. आपल्यासाठीं एक वस्तू घेऊन आलोंय. दरवाजा तरी उघडा!"

**अंजिराचें पार्सल आलें**

दरवाजा उघडण्यांत आला. एक घरगुती नोकर हातांत करंडी घेतलेला डॉक्टर-साहेबांपुढें हजर झाला व म्हणाला, "साहेब, आमचे धनीसाब मुंबईला गेले होते. ते नुकतेच आले. त्यांनीं हा अंजिराचा करंडा आपल्यासाठीं तावडतोब पाठवून दिलाय्. ते उद्यां सकाळच्या गाडीनें रंगूनला जाणार आहेत. यासाठीं मी आपणांस अवेळीं येऊन त्रास दिला. माफ करा महाराज!"

अंजिरांचें नांव ऐकतांच कैलासबाबू आश्चर्यचकित झाले. किती आनंद झालाय् त्यावेळीं त्यांना! हें कोडें त्यांना उलगडेना. केवढी ही प्रभूची कृपा! याला म्हणायचं तरी काय? हा योगायोग म्हणायचा का? ईश्वरी हात असल्याशिवाय का असली घटना घडून येत असते! त्यांच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले! ते तसेच आईच्या खोलींत गेले व तिच्या पुढें अंजिरांची ती टोपली उघडी करून ते म्हणाले, 'तुला अंजीर खाण्याची इच्छा झाली आणि भगवंतानें ती पूर्ण केली आहे. तुझ्यावर व माझ्यावर त्याची कृपादृष्टि आहे म्हणूनच येथें न मिळणारी ही दुर्मिळ वस्तु तुझ्यापुढें हजर झाली!'

---

# स्वामी शिवानंद यांची साधना

**स्वामी शिवानंद हे आजच्या काळांतील एक थोर व आदर्श सत्पुरुष आहेत. त्यांचें जीवन म्हणजे देवाचें जीवन. ते कसे वागतात, ते काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या, व त्यांची रोजची दिनचर्या ही समजून आल्यानें कोणाला आनंद होणार नाहीं?**

मी दाक्षिण भारतांत तिरुवन्नमलय भागांतील पट्टामडाई गांवच्या श्री पी. सी. वेगू अय्यर आणि श्रीमती पार्वती अम्माल यांच्या पोटीं ८ सप्टेंबर १८८७ रोजीं जन्माला आलों.

मी अप्पय दीक्षितांचा वंशज आहे. माझें जन्मनक्षत्र भरणी. मी लहानपणीं मोठा बांड होतों. त्रिची येथील एस्. पी. जी. कॉलेजमध्यें माझें शिक्षण झालें. मलाया देशांत १० वर्षें डॉक्टर होतों. १९२४ सालीं हृषीकेशला येऊन संन्यास घेतला. त्यानंतर तपस्या आणि ध्यान यांत १५ वर्षें घालविलीं. १० वर्षें परिव्राजकावस्थेंत प्रचारक आणि सुधारक म्हणून आदर्श जीवन व्यतीत केलें. १९३६ सालीं 'दिव्य जीवन संघ' आणि १९४५ सालीं 'अखिल विश्वधर्म संघ' यांची स्थापना केली.

## जप व ध्यान हे सोबती

मी स्वभावानें बालक आहें. मी सर्वांना भेटतों आणि सर्वांशीं सर्वांसारखाच होतों. मी नेहमीं प्रसन्न आणि आनंदीं असतों आणि इतरांनाही प्रसन्न आणि आनंदी करतों. माझ्या ठिकाणीं विनोद भरपूर आहे. मी सर्वांचा सन्मान करतों. प्राणिमात्राला वंदन करण्यांत मी अग्रेसर असतों. मी नेहमीं मधुर बोलतों, जलद चालतों आणि फिरतांना नि काम करतांनाही निरंतर जप आणि ध्यान करीत असतो.

माझी आत्यंतिक प्रवृत्ति कर्मयोग आहे. काम पुरें झाल्याशिवाय मी तें सोडत नाहीं. कोणत्याही कामाला मी विलंब करीत नाहीं. मी निरंतर कठीण परिश्रम करतो. कोणतेंही कार्य असो, मी तें तात्काळ पुरें करतों. माझ्या ठिकाणीं असलेला स्वाभाविक सेवाभाव मी दाबून ठेऊं शकत नाहीं. सेवा केल्यावांचून मला रहावतच नाहीं. सेवेनेंच मी वाढलों आहे आणि त्यांतच मला आनंदाची अनुभूति होते. सेवा-भावेंच माझें हृदय पवित्र झालें आहे. कोणाकडून काम कसें घ्यावें हें मी उत्तम प्रकारें जाणतो. करुणा, सेवा आणि प्रेमभावानें मी काम घेतों.

मी आसन, व्यायाम नियमितपणें करतो, त्याचप्रमाणें प्राणायामही. हीं मला स्वास्थ आणि शक्ति देतात. मी 'भजन हॉल' (भजनालय) च्या कांहीं फेऱ्या नित्य धांवत करतो. विशिष्ट आसन किंवा गादीवर बसून मी ओजस्वी व्याख्यान देत नाहीं. मी गादीवरून उठतो आणि गादी फेंकून देतो तेव्हांच बोलणें सुरू करतो. जेव्हां मी धार्मिक संमेलनांचा सभापति झालों तेव्हांही मी सिंहासनावर अथवा गादीवर बसलों नाहीं. मी सदा दान देतच आहे आणि दान करण्यांतच मला आनंद वाटतो.

### लेख लिहिण्यांत आनंद

मी ७३ वर्षांचा आहे. मी स्वतःला नेहमीं नवयुवक समजतों. मी बल, ओज आणि शक्तीनें परिपूर्ण आहे. मी नेहमीं प्रसन्न असतों. मीं आनंदाच्या भरांत गातों, नाचतों, फिरतों, पळतों आणि उड्याही मारतों. मी निरोगी आणि बलवान् आहे. कोणताही आहार मी पचवूं शकतों. मी सतत कार्य करतो, वाचतो आणि लिहितोही. नव्या कार्याचें परिवर्तन मला अतिशय सुख देतें आणि ध्यान मला शांति देतें. लेख लिहिण्यांत मला आनंद मिळतो. ध्यान मला शक्तिशाली आणि गौरवशाली बनवितें. कीर्तन मला दिव्य बनवितें.

'अहं ब्रह्मास्मि' 'शिवोऽहम्' 'सोऽहम्' 'सच्चिदानंद स्वरूपो हम' हे माझ्या वेदांतिक ध्यानाचें अतिप्रिय मंत्र आहेत. 'चिदानंद संगीत' हें माझें अत्यंत प्रिय गान आहे.

**हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।**
**हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥**

हा महामंत्र मला भजनाला अतिशय आवडतो. मी सम्राटांचा सम्राट आणि महाराजांचा महाराजा आहें. भगवंताची अखिल संपत्ति आतां माझी झाली आहे. माझें साम्राज्य माझें धन अक्षय, नि माझा आनंद अवर्णनीय आहे. मी ही स्थिति सम्यक् संन्यास, अथवा सेवा, जप, भजन आणि ध्यान यांनीं प्राप्त केली आहे.

### मी सदा तरुण आहें

मी सहा फूट उंच आहें. माझें शरीर सुडौल आहे. मी पहिल्या दर्जाचा खिलाडू आहे. मी एकादशीला उपवास करतों. त्या दिवशीं मी पाण्याचा थेंबही घेत नाहीं. मी रविवारीं दुग्धाहार आणि फलाहार करतों. माझ्या ठिकाणीं नवयौवनाचा स्त्रोत वहात आहे.

मी निसर्ग, संगीत, कला, काव्यदर्शन, सौंदर्य, एकांतवास, ध्यानयोग आणि वेदांताचा अनन्यप्रेमी आहे. मी सरळ, नम्र, निष्कपटी आणि छलशून्य आहे. मी स्पष्टवादी, परम सहिष्णु, दया आणि सहानुभूतीचें भांडार आहे. तत्काल मुक्त हस्तानें दान करणारा आहे. मी साहसी, प्रसन्नचित्त आणि धैर्यवान् आहे. मी हानि आणि अपमान सहन करतो. प्रतिहिंसेची भावना माझ्यांत नाहीं. ज्यानें मला कष्ट दिले त्याची सेवा मी आनंदानें करतों.

गंगा–हिमालयावर माझें प्रेम आहे. गंगा माझी दिव्य माता आणि हिमालय माझा पिता आहे. मी नित्य गंगास्नान करतों, गंगापूजन करतो, गंगेंतल्या माशांना अन्न घालतों. मी गंगेची आरती करतों, स्तुति करतों, गंगा महात्म्य आणि गौरवगानाची गाथा लिहितों. गंगेनें माझें भरणपोषण केलें आहे, तिनें मला उपनिषदांचीं रत्नें दिलीं आहेत.

### सदासर्वदा उद्योगांत

माझा नित्याचा कार्यक्रम भगवान् बुद्धाची चर्या आहे. मी नेहमीं माझ्या कुटीरांत असतो. मी जप, कीर्तन आणि ध्यान यांचा अभ्यास करतो. मी धर्मग्रंथांचा स्वाध्याय करतों. मी थोडा वेळच आवश्यक कार्य, सेवा आणि पाहुण्यांच्या दर्शनार्थ

बाहेर जातों. मी कमी बोलतो पण विचार अधिक करतो. मी ध्यान अधिक करतों. मी अधिकाधिक कार्य आणि अधिकाधिक सेवा करतों. मी एक क्षणही व्यर्थ घालवीत नाहीं. मी सदैव परार्थकार्यात गुंतलेला असतो. मी सर्वदा आत्म्याची पूजा करतो.

श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद् भागवत, योगवासिष्ठ, अवधूत गीता, विवेक चूडामणि हे माझे नित्याचे सोबती आहेत. सेवा, भक्ति, योग आणि ज्ञान यांचा मी समन्वय आहे. मी शंकराचा अनुयायी आणि 'केवलाद्वैत वेदांती' आहे. मी केवळ शुष्क वेदांती नसून व्यावहारिक वेदांती आहे. मी समन्वय योगाचा अभ्यास आणि प्रचार करतों. मी सत्य, अहिंसा आणि ब्रह्मचर्य यांचें पालन करतो.

मी सर्वंच मतांच्या संतांना आणि आचार्यांना मानणारा आहे. मी सर्व धर्म, मतें, पंथ आणि संप्रदायाचा सन्मान करतों. मी सर्वत्र आपल्या भगवंतालाच पहातो. मी दरिद्री नारायणाची सेवा करतों. हा माझ्या जीवनाचा आनंद आहे. मी मनानें गर्दभ, श्वान, वृक्ष, पाषाण आणि पशुपक्ष्यांनाही नमस्कार करतों. मी अतिथींची सेवा पराकाष्ठेनें करतो आणि रोग्यांचें नि साधूंचे पाय चेपतो.

मी पत्राचीं उत्तरें तत्काळ देतों. मी एका वेळेला अनेक कामें करतों. विजेप्रमाणें तीव्र गतीनें मी लिहितों. मी सर्व कांहीं खर्च करतों. दान पुष्कळ करतों. शिल्लक मुळींच ठेवत नाहीं. माझ्या शिष्यांना, आश्रितांना आणि दरिद्री लोकांना जेऊं घालण्यांत मला अत्यंत आनंद होतो. मी नेहमीं आत्मपरीक्षण, आत्मनिरीक्षण, आत्मसंशोधन आणि आत्मविश्लेषण करतों. मी आध्यात्मिक दैनंदिनी. नित्याची दिनचर्या आणि प्रतिज्ञापत्राच्या त्रिशूलानें युक्त आहे.

## गुरुजनांची सेवा

मी माझ्या गुरुजनांची सेवा सतत पूर्ण भक्ति, श्रद्धा आणि सद्भावानें केली आहे. मी जीवनांत आदर्श धडे घेतले आहेत. मी सद्गुणांचा विकास केला आहे. मी परिव्राजक अवस्थेंत निराहार हिंडलों आहे. पाण्याबरोबर वाळलेले तुकडे खाल्ले आहेत. शीतकालांत रात्रीच्या वेळा न पांघरतां झोपलों आहे. मी आपल्या आदर्श आणि सिद्धांताला दृढतेनें चिकटून राहिलों आहे. मी अधिक तर्क करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. मी मौन राहतों.

विश्वशांतीसाठीं, रोग्यांना आरोग्य, जीवन, सुख आणि स्वास्थ्य लाभावें म्हणून दिवंगत आत्मे आणि संसारयुक्त प्रेतात्मे यांच्या चिरशांतीसाठीं प्रार्थना करतों. भजनालयांत सर्व मतांच्या आणि संप्रदयांच्या संतांचें नामकीर्तन करतों आणि सर्व धर्माचार्यांच्या नि दिव्य पुरुषांच्या जयंती साजऱ्या करतों.

मी निरंतर 'प्रज्ञानं ब्रह्म' 'अहं ब्रह्मास्मि' 'तत्त्वमसि' 'अयमात्मा ब्रह्म' 'सत्यं ज्ञान मनन्तं ब्रह्म' 'शान्तं शिवं अद्वैतं, अहमात्मा गुडाकेश 'अहं आत्मा निर्विकारः सर्वव्यापी स्वभावतः, ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' अकर्ता, अभोक्ता, असंग साक्षी, अजः, नित्यः, शाश्वतो अयं पुराणः, 'ज्योतिषामपि तज्ज्योतिः' या वचनांचें ध्यान करतों.

# भगवत्कृपेची छाया

**भगवंताच्या कृपेची ओळख आपण आपत्तींत असतों, संकटांत गुरफटून जातों व कोणाचा आसरा नाहींसा होतो त्याचवेळीं होते. सुखासीन व वैभवशाली जीवनांत त्याची आपणास आठवणही होत नाहीं.**

मनुष्य सुखसमाधानांत ऐश्वर्यांत व आनंदात रहात असतो तेव्हां त्याला सहाजिकच वाटत असतें कीं, भगवंताची माझ्यावर केवढी मोठी कृपा आहे हो! परंतु वस्तुस्थिति तशी नसते. भगवंताची कृपा सर्वांवर व सदासर्वकाळ असते. मनुष्य कोणत्याही अवस्थेंत असो. ती अवस्था त्याच्या कृपेचेंच फळ असतें.

मनुष्याला अनुकूल परिस्थिती प्राप्त होते. सुखोपभोग मनाप्रमाणें वाट्याला येत आहेत. परंतु या साऱ्या गोष्टी मायामोहांत गुरफटून टाकणाऱ्या असतात. ज्या गोष्टी मायामोहाच्या पसाऱ्यांत माणसाला गुंतवून टाकतात व त्याला दूर करतात त्या गोष्टींना आपण भगवंताची कृपा कां बरें मानावी? ज्यामुळें भगवंताचें स्मरण करण्यांत अंतराय उत्पन्न होतो त्या गोष्टी मिळाल्या म्हणजे भगवंताची कृपा झाली असं कां मानायचें?

**चुकीची कल्पना**

आपल्या वांट्यास प्रतिकूल परिस्थिति आली; आपत्ति हालअपेष्टांत दिवस कंठावे लागले म्हणजे मग भगवंताची अवकृपा झाली असें समजायचें. मग म्हणायचें कीं देव कठोर आहे. त्याला दयामाया कांहीं नाहीं. तो निष्ठुर आहे.

तेव्हां अमुक प्रकारची स्थिति वाट्यास आली असतां भगवंताची कृपा झाली असें म्हणायचें व अमुक प्रकारची स्थिति वाट्यास आली असतां त्याची अवकृपा झाली असें मानावयाचें ही चुकीची कल्पना आहे.

मनुष्याला एखाद्या बाबतींत यश मिळत गेलें कीं भगवंताची कृपा आहे असें मानावयाचें व आस्ते आस्ते त्या कृपेचा त्याला विसर पडत जातो. तो, नंतर स्वतःच्या कर्तबगारीला महत्त्व देऊं लागतो. त्याचा अहंकार वाढत जातो. मी असें केलें म्हणून तसें झालें, मी हुषारी दाखविली, चतुराईनें वागलों म्हणून यश पदरांत पडलें असा

---

पतितांना सहाय्य करणें, अंधांना मार्गदर्शन करणें, वांटणी करून खाणें, जें कांहीं मिळेल त्याचा उपयोग सर्वांनीं घेणें, संततांना सांत्वना देणें, पीडितांना प्रसन्न करणें हाच माझा मुख्य जीवनोद्देश आहे. ईश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवणें, शेजाऱ्यांना आपलें समजणें, भगवच्चरणावर मनःपूर्वक प्रेम करणें, गाय, पशु, स्त्रिया आणि मुलें यांचें सुयोग्य रक्षण करणें हेंच माझ्या जीवनाचें लक्ष्य होय. प्रेम हें माझें बीजाक्षर आणि सहजसमाधि हें माझें लक्ष्य आहे.

—पुरुषार्थावरून साभार

अहंकार त्याच्याठायीं जागा होऊं लागतो. मी पैसा मिळविला, मी माझ्या कर्तबगारीनें मानसन्मान मिळविला, मी विजयी झालों, मी समाजकार्य केलें, देशकार्य केलें म्हणून मला समाज किंवा देश मान देतो; उगाच नाहीं. प्रत्येक ठिकाणीं मी उभा राहूं लागतो.

## भगवंताचें ब्रेक लावणें

मनुष्य जेव्हां अशा रीतीनें बेहोष होऊन जातो, स्वैरपणें वागूं लागतो, अहंकाराच्या आहारीं जातो तेव्हां त्याला 'ब्रेक' लावणें भगवंताला आवश्यक वाटूं लागतें. भगवंताला त्याची दया येते. तो खरोखर दयामय व कृपाळु आहे. त्याला त्या माणसावर कृपेची पाखर घालावी, त्याचे डोळे उघडावे व त्याला खड्यांत पडून गाडला जाण्यापासून वाचवावें असें भगवंताला वाटूं लागतें आणि मग ?

भगवंताची त्याच्यावर कृपा होते! म्हणजे काय होतें? त्याचें ऐश्वर्य जातें. मानमान्यता नाहींशी होते. कुठेंही तोंड दाखवायला जागा रहात नाहीं.

## बळी राजाची गोष्ट

बळी राजाची गोष्ट आहे माहीत आपणांला? बळी हा केवढा प्रबळ राजा झालेला होता! त्यानें सारें जग जिंकिलें. देवदेवतांचें सामर्थ्य नामशेष झालें. देवतांचा थरकांप होऊं लागला; परंतु इतकें झालें तरी बळी हा भगवंताचा भक्त होता. भगवत् कृपेमुळें मला हें ऐश्वर्य मिळालें असें मानणारा तो होता. परंतु एवढें ऐश्वर्य, एवढा थोरपणा आल्यानंतर कोणाला अहंकार होणार नाहीं? त्या अहंकारानें बळीच्या देहांत घर केलें.

भगवंताला त्या आपल्या भक्ताची दया आली. त्याच्यावर कृपा करावी असें भगवंताला वाटूं लागलें. मग काय केलें भगवंतानें? त्याचें सारें ऐश्वर्य, त्याची सारी मानमान्यता हिरावून घेतली. त्याला नामशेष करून टाकिलें!

कां बरें असें स्थित्यंतर घडवून आणिलें? याचें एकच स्पष्ट उत्तर आहे. बळीराजावर कृपादृष्टि करावी असें भगवंताला वाटलें. असें कां केलें? कारण बळीला आपल्या राज्य विस्ताराचा, ऐश्वर्याचा व मानमान्यतेचा अहंकार झालेला होता. तो भगवंताला पारखा होत चालला होता. त्याचें पतन होऊं लागलें होतें. तें वाचवावें हा भगवंताचा हेतु होता. भगवंताला त्याचे डोळे उघडावयाचे होते. त्याला वाचवायचें होतें; आणि म्हणून ज्यामुळें त्याला अहंकार झाला त्या साऱ्या गोष्टी भगवंतानें त्याच्यापासून हिरावून नेल्या. त्याला साफ मोकळा केला. सपाट करून टाकिलें. भगवंतानें त्याच्यावर केलेली ही कृपाच नाहीं का?

## प्रल्हादानें बरोबर जाणलें

प्रल्हाद हा बळीचा आजोबा. तो भगवंताचा परमभक्त. बळीचें सर्वस्व हिरावून घेतलें या गोष्टीचा त्याला केवढा आनंद झाला? तो भगवंताला हात जोडून म्हणाला, हे भगवत्! बळीला आपण फार मोठें पद दिलें. परंतु तें हिरावून घेऊन आपण त्याच्या-

वर फार मोठी कृपा केली आहे. संपत्तीचा मोह फार वाईट. त्या मोहापासून बळीची योग्य वेळीं आपण सुटका केली म्हणून आपणास त्रिवार वंदन. (भागवत अ. ८)

जेव्हां एखाद्यावर भगवंताची कृपा व्हायची असते किंवा होते तेव्हां तो त्याच्या सर्व ऐश्वर्याचा नायनाट करून टाकतो. कारण ऐश्वर्यसंपन्नता ही भगवंताच्या भेटींत अंतराय आणणारी असते. एखादा मनुष्य मोठ्या मानसन्मानाला पोहोंचतो तेव्हां त्याला भगवंताची विस्मृति होते.

त्या मानसन्मानाच्या मायेंतच तो गुरफटला जातो. मग त्याची उन्नति व्हायची कशी? त्या मानाच्या जाळ्यांतून त्याला खेचून बाहेर काढावयाचें. त्याचा अपमान व मान खंडना करावयाची. भगवंत ही अशी परिस्थिति घडवून आणतो त्यावेळीं त्याच्या मागें कृपादृष्टीच असते.

**सहस्र अपराधांची क्षमा**

"मला खालीं खेचणारा कोण आहे मी सर्व समर्थ आहें. मी काय वाटेल तें करूं शकतों!" अशा प्रकारच्या वल्गना अहंकाराच्या आहारीं जाऊन तो करीत असतो. भगवंताचें त्याच्याकडे पूर्णपणें लक्ष असतें. तो सहस्र अपराध माफ करतो. तुमचे डोळे उघडावेत म्हणून तुम्हांला भरपूर संधी देतो; परंतु दिवसेंदिवस तुमची अहंकार वृत्ति, डल्ला मारण्याची वृत्ति, अपहार करण्याची वृत्ति उत्तरोत्तर बळावत जाते. मग एके दिवशीं भगवान तें तुमचें ऐश्वर्य अचानकपणें हिरावून नेतो. मग तुम्हांला राग येतो. परंतु हें जें घडतें तें तुमच्या शाश्वत कल्याणासाठींच होय.

संसारांतील मायामोहाच्या जाळ्यांत मनुष्य अडकून पडतो व त्यांत जखडला जातो. भगवंताला त्याची दया येते; आणि मग ताटातुटीचे प्रसंग उद्‌भवतात. मग त्याचे डोळे उघडतात. मग त्याला वाटूं लागतें कीं, या जगांत आपलें कोणी नाहीं. उगाच माझें माझें करून आपण मोहपाशांत सांपडलों होतों. हें सारें अशाश्वत आहे. शाश्वत एकच. भगवन्नाम व भगवंताची कृपा. तशा त्यावेळीं भगवानच त्याचें समाधान करतो कीं, हे बंधो! तूं निराश होऊं नकोस. भलत्याच मोहांत सांपडून जन्माचें मातेरें करू नकोस. डोळे उघड आणि मग माझ्याकडे पहा. माझ्याजवळ ये मीच तुला शाश्वत सुखाचा मार्ग दाखवीन.

**भगवंताचें मांगल्य**

जेव्हां जवळ विपुल संपत्ति आहे, सर्व सुखें सुखज आहेत. वाण कसलीच नाहीं. तशा स्थितींत भगवंताच्या कृपेची जाणीव व्हावी व होतेही. परंतु ज्यावेळीं संकटें काहूर करतात, दुःख दुर्दिन वांट्यास येतात; जिकडे तिकडे अभावच अभाव आढळून येऊं लागतो, मानाऐवजीं सर्वत्र अपमानाशीं सामना द्यावा लागतो; त्यावेळीं भगवंताच्या कृपेची, त्याच्या दयाळुत्वाची व त्याच्या मंगलत्वाची आपणास अधिकाधिक जाणीव झाली पाहिजे.

———

# तुम्हीं स्वतःला ओळखा

लेखक : आप्पाराव

**तुम्हीं स्वतःला हीन, दीन कां समजतां? प्रत्यक्ष भगवंताचें वास्तव्य तुमच्याठायीं असतां तुम्हीं हीन दीन कसे? पुरुषार्थ गाजविणें तुमच्या हातीं आहे. मनुष्य काय वाटेल तें करूं शकतो. त्याला स्व-सामर्थ्याची ओळख पटली पाहिजे. त्यानें आत्मनिरीक्षणानें स्वतःचा उद्धार करून घेतला पाहिजे. त्यासाठींच तर मनुष्यजन्म प्राप्त झालेला आहे.**

प्रत्येक मनुष्याजवळ जगांत पुढें येऊन पुरुषार्थ गाजविण्याचें व आपलें जीवन सफल करण्याचें सामर्थ्य सुप्तरूपानें वास करीत असतें; परंतु अज्ञानामुळें व मोहवशतेमुळें त्याची आपणांस दादही नसते. त्यामुळें आपण स्वतःला हीन दीन व कमनशिबी समजत असतों. आमच्याठायीं वास करणाऱ्या दैवी शक्तीचा आम्हांला विसर पडलेला असतो. अज्ञान दुसरें कोणतेंही नसेल. आम्हीं उगाच दीन दुबळ्यांचें जीवन जगत असतों. आम्हीं स्वतःशींच बडबडत असतों कीं, गरीब व दीनहीन स्थितींत जन्म झाला, सभोंवार सारी प्रतिकूल परिस्थितींत जन्मलों तसाच गरीब व हीन स्थितींत एके दिवशीं या जगाचा निरोप घ्यायचा!

## दुबळेपणाचे विचार

किती दुबळेपणांचे विचार आहेत हे! तुम्हीं असे किंकर्तव्यमूढ कां बरें व्हावें? मी दीनहीन नाहीं. मी सिंहाचा बच्चा आहें. परमेश्वर माझ्याठायीं वास करीत आहे. मी लाथ मारीन तेथें पाणी काढीन. मला काय कमी आहे. मी करीन ती पूर्व! असें कां म्हणत नाहीं व ज्या परमेश्वरानें तुम्हांला हा मनुष्य जन्म दिला, त्याच्यावर विश्वास ठेऊन सतत उद्योगानें जीवन सार्थकीं कां लावीत नाहीं?

परमेश्वरी इच्छा माहीत आहे का तुम्हांला? तुमच्या ठायीं अनेक गुप्त शक्ति वास करीत आहेत. त्यांच्यावर फुंकर मारून तुम्हीं त्या जागवाव्या. तुमच्या ठायीं अपरंपार सामर्थ्य आहे त्याचा तुम्हीं सत्कारणीं व्यय करावा. तुम्हीं अंगभूत शक्तीच्या बळावर पुरुषार्थ गाजवावा. जगांत मानमान्यता व प्रतिष्ठा मिळवावी व सदैव उन्नतीचा मार्ग चोखाळीत रहावें ही ईश्वरी इच्छा आहे. ईश्वरानें मानमान्यता, ऐश्वर्य व सुसंपन्नता तुमच्यासाठीं कोनाकोपऱ्यांतून ठेऊन दिलेली आहे. ती आपल्या योग्यतेच्या, परिश्रमाच्या व चिकाटीच्या बळावर तुम्हीं प्राप्त करून घ्यावयाची आहे.

## सामर्थ्याचें केंद्र

महान् शक्तींचा डायनॅमो तुमच्या अंतरंगांत सुप्त मनाच्या रूपानें वास करीत आहे. तुमचें अंतर्मन हें सामर्थ्याचें केंद्र आहे. तें मन जागें झालें पाहिजे. मनाची शक्ति अमर्याद आहे. मानसिक, बौद्धिक व आत्मिक शक्तीची ती खाण आहे. त्या शक्तींचा विकास करण्यांत आला पाहिजे. नाहीं विकास केला तर त्या शक्ति तशाच गंजत धूळ खात पडून रहातात.

आपल्या मनाचें सामर्थ्य अगाध व अपरंपार आहे. त्याला आपण चेतन बनविलें पाहिजे. स्वतःला हीन हीन समजण्याचें सोडून दिलें पाहिजे. सारें तुम्हीं मानण्यावर आहे. तुम्हीं स्वतःला रोगी समजूं लागला तर नाना रोगांना घर करून रहायला तुम्हीं जागा करून द्याल. मी निरोगी आहें. मी शक्तिसंपन्न आहें. मला या जगांत पुरुषार्थ गाजवावयाचा आहे व मी तो गाजवून दाखविणार आहे. ही भावना दृढ करून तुम्हीं वावरूं लागला म्हणजे आपोआप तुमच्या ठायीं शक्तिसामर्थ्याचा संचार होऊं लागेल. तुम्हीं ज्या गोष्टीचा निदिध्यास घ्याल त्या गोष्टी आज नाहीं उद्यां तुमच्या पदरांत पडल्याशिवाय रहाणार नाहींत. तुम्हीं आपल्या अंतर्मनाबरोबर संधान साधिलें पाहिजे.

## आपलें वैशिष्ट्य शोधून काढा

तुम्हांला कल्पना नसेल एवढी अपरंपार व प्रचंड शक्ति तुमच्या ठायीं वास करीत आहे. भगवंताचेंच एक स्वरूप तुम्हीं अहांत. तुम्हांला काय कमी आहे ? परंतु अज्ञानापायीं तुम्हीं नामोहरम झालेले आहां. तुमचा कल कुठें आहे, तुमची आवड कोणती, तुमचें वैशिष्ट्य बारकाईनें निरीक्षण करून समजूत घेण्याचा प्रयत्न करा आणि मग तदनुरूप वागण्याचा निर्धार करून त्याप्रमाणें वागूं लागा. तुमचें एकेक पाऊल पुढें पुढें पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

तुमचें वैशिष्ट्य तुम्हीं कधीं ओळखलें आहे का ? तें शोधून काढण्याचा कधीं प्रयत्न केला आहे का ? आत्मनिरीक्षणाची स्वतःला सवय लावून घ्या. आपले गुण, अवगुण पारखूं लागा. प्रत्येक मनुष्यानें आत्मनिरीक्षणाची सवय लावून घेतली पाहिजे. हें मनुष्यजीवन कसें तरी खर्च करून टाकण्यासाठीं नाहीं. हें पशुपक्षाचें जीवन नाहीं. हें जीवन पुरुषार्थ गाजवून दाखविण्यासाठीं आहे; याची आपल्यापैकीं प्रत्येकानें खूणगांठ बांधून त्याप्रमाणें वागूं लागलें पाहिजे.

## स्वतःचें व्यक्तित्त्व समृद्ध करा

तुम्हीं आपलें व्यक्तित्व समृद्ध करण्यासाठीं परोपरीनें झटलें पाहिजे. त्यासाठीं परिस्थितीशीं अविरत झगडत राहिलें पाहिजे. तुम्हांला मागें खेचणारे दुर्गुण किती तरी आहेत. अहंकार आहे; दांभिकपणा आहे. किती सांगूं ? एक ना दोन ! अहो ! कितीतरी !

नका त्यांच्या आहारीं जाऊ. लाथाडून टाका त्यांना ! संकुचित भावना, आप्पलपोटेपणा सोडून द्या सारा ! पंगू, दुबळे बनूं नको. उत्तिष्ठत ! जाग्रत !!

विचारी बना. मग तुम्हांलाच तुमच्या ठायीं वास करणारे दुर्गुण व उणीवा आढळून येतील. मनाचा वारू स्वैर सोडू नका. शांतचित्त व्हा. एखाद्या शांत, निवांत जागीं जाऊन थोडावेळ तरी विचार मग्न व्हा. घटकाभर घरींदारीं सतावणाऱ्या चिंता दूर लोटून स्वस्थितिबद्दल विचार करूं लागा. हलक्या सलक्या कुजक्या नासक्या विचारांच्या आहारी जाऊं नका. उन्नत विचारांचीच कास धरा. तुम्हांला उन्नतीच्या मार्गानें जावयाचें आहें. तें गिरीशिखर गांठावयाचें आहे.

## ईश्वर पाठीराखा

आपला भविष्यकाळ उज्वल व तेजस्वी व्हावा असें वाटतें ना तुम्हांला ? मग सद्विचारांचीच कांस धरा कोणाचा मत्सर नको, कोणाहीबद्दल दुष्टावा नको, हेवादावा नको आणि कांहीं नको. मला माझें जीवन सफल व सर्वतोपरी यशस्वी करावयाचें आहे ईश्वर माझा सहाय्यकारी आहे. तो मला अंतर देणार नाहीं. त्याचप्रमाणें मीही त्याला क्षणभरसुद्धां विसरणार नाहीं. जें करीन तें त्याच्या नांवानें. साईबाबा माझे पाठीराखे आहेत. त्यांच्यावर संपूर्ण श्रद्धा टेऊन मी प्रत्येक पाऊल टाकूं लागलों, स्वतःच्याच नव्हे तर सर्वांच्या कल्याणासाठीं क्षटूं लागलों तर ते मला अंतर देणार नाहींत. तेच मला मार्ग दाखवितील व माझे मनोरथ पूर्ण करतील.

## श्रद्धा हेंच सामर्थ्य

श्रद्धा म्हणजेच शक्तिसर्वस्व. तुम्हीं मनुष्य जन्म घेतला तेव्हां तुमच्या ठायीं तेजाचा रवि तळपत आहे. पडदा दूर सारून त्याचें दर्शन घ्या. त्याला साक्ष ठेऊन प्रत्येक गोष्ट करूं लागा. मी कोणीतरी आहे. कोणीतरी कां ? मी प्रति भगवान आहे, शक्तिसंपन्न आहे, मी या जगांत वाटेल तें करूं शकेन ! अशा दृढ श्रद्धेनें तुम्हीं वागूं लागला म्हणजे पहा तुमच्याकडून पुरुषार्थ घडतो कीं नाही तें ! आत्मश्रद्धा ही एक अमोलिक चीज आहे. ती तुम्ही संपादन करा. तुम्हीं कोण हें ओळखा. कोणाचीही भीती बाळगूं नका. निर्भय व्हा. निःशंक व्हा. तुमचे शत्रू व तुमचे मित्र तुमचे तुम्हींच आहांत हें निश्चित समजा. तुमचा मारेकरी तुमच्याशिवाय दुसरा तिसरा कोणी नाहीं. मनुष्य आपल्या कर्मानें जगतो वा मरतो. असें कर्माचरण करा कीं मरण तुमच्या वाट्याला येणार नाहीं, वाऱ्याला उभे रहाणार नाहीं. मग जगाच्या दृष्टीनें मरूनही तुम्हीं अमर होऊन रहाल.



# श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

## साईभक्तांनी संस्थानला दिलेल्या १०० पेक्षां जास्त देणग्यांची यादी

| अ. नं. | भक्ताचें नांव | गांव | रु. न. पै |
|---|---|---|---|
| १ | श्री. काश्मिरचे महाराजा | काश्मिर | ३०१·०० |
| २ | ,, महाराजा ऑफ ग्वाल्हेर | ग्वाल्हेर | १०१·०० |
| ३ | ,, दोंडाप्पा बसाप्पा इटागी | बल्लारी | १०१·०० |
| ४ | ,, मोतिलाल ब्रिजालाल गुजराथी | उगवा | १०१·०० |
| ५ | ,, रामचंद्र सखाराम पाटील | खडगांव ता. धुळें | १०१·०० |
| ६ | ,, किशन नारायण | नासिक रोड | १०१·०० |
| ७ | ,, ल. वा. शेवडे | मुंबई | १००·०० |
| ८ | ,, एस. एफ. पोचा | नागपूर | १०१·०० |
| ९ | ,, भोगिलाल के. शहा | माधवनगर सांगली | ८००·०० |
| १० | ,, धुमा ल्हानु जाधव | बोराडखेडे | १०१·०० |
| ११ | ,, एक भक्त | | १००·०० |
| १२ | ,, एम. जी. रावल | नागपूर | २०१·०० |
| १३ | ,, अे. वेणु गोपाळ राव | लासूर | १००·०० |
| १४ | ,, एम. जी. रावल | नागपूर | ३००·०० |
| १५ | श्रीमती काशीबाई परशराम देसाई | मुंबई २८ | १००·०० |
| १६ | ,, गंगुबाई नर्स | इंदोर | १०१·०० |
| १७ | श्री. जसुभाई पटेल | मुंबई २६ | १५०१·०० |
| १८ | ,, वी. के. कुमार | पुणे ५ | १०१·०० |
| १९ | श्री. सिताराम कल्याणजी शर्मा | मालेगांव | १०१·०० |
| २० | श्रीमति प्रेमा दयाळ | वकानेर | १०१·०० |
| २१ | ,, सुंदराबाई अण्णा उमारे | पळसोड | १००·०० |
| [illegible] | श्री. रामदास बायाजी गरुड | अनकवाडी पो. मनमाड | १००·०० |
| | [illegible] | कुराड खु॥, ता. पाचोरे | १२५·०० |
| २४ | ,, राम नारायण दलाल | वसमत नगर | १०१·०० |
| २५ | ,, एस. एस. साठा | मुंबई | १००·०० |
| २६ | ,, मनुभाई पी. पटेल | नैरोबी | १२४·०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | ,, बापूराव जिजाराव भालेराव | मु. गुंडा, जि. परभणी | १००.०० |
| २८ | ,, आर. जे. देसाई | नडीयाद | २६०.०० |
| २९ | ,, जगाभाई निछाभाई पटेल | टोली (नवाफालिया) नवसारी | २२५.०० |
| ३० | ,, हसमुखलाल देसाई | सुरत | ११२.५० |
| ३१ | ,, एक भक्त | | १०१.०० |
| ३२ | ,, पटेल ऑईल मिल्स | नंदुरबार | १५१.०० |
| ३३ | कै. मुरलीधर तुकाराम पिसाळ | घोडकी | १२५.०० |
| ३४ | श्री. एम्. डी. मेहता | मुंबई ५७ | १०१.०० |
| ३५ | ,, रजनीकांत पोपटलाल | मुंबई | १००.०० |
| ३६ | ,, एम्. सी. चव्हाण | मुंबई ४ | १०१.०० |
| ३७ | ,, हिजहायनेस दि. महाराजा ऑफ सांगली | सांगली | १०१.०० |
| ३८ | ,, रामचंद्र रावजी नातू | पोरबंदर | १२२.५० |
| ३९ | कै. रेखा हुकेरी | बागलकोट | १०१.०० |
| ४० | श्री. एच्. के. शेठ | अद्दीस अबाब | १०१.०० |
| ४१ | ,, कारभारी नाना तमनर | राहूरी देशवंडी | १२५.०० |
| ४२ | ,, अमिलाल छगनलाल | मुंबई २ | १२५.०० |
| ४३ | ,, वैद्यनाथन् | सिकंदराबाद | ३६०.०० |
| ४४ | सौ. लता शंकरराव अडी | बडोदा | १२५.०० |
| ४५ | श्री. कन्हैयालाल मांगीलाल खंडेलवार | धुळें | ४२२.०० |
| ४६ | ,, दलसुखभाई एन्. माणेकर | मुंबई २६ | १०१.०० |
| ४७ | ,, जिवनभाई के. पटेल | नवसारी | १२५.७५ |
| ४८ | श्री. के. व्ही. हगवणे | पुणें | १००.०० |
| ४९ | ,, एच्. टी. खाटसुरीया | मुंबई ८० | १७५.०० |

## मेडीकल फंड

| अ. नं. | भक्ताचें नांव | गांव | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबूराव अप्पाराव कामेरे | महिसूर, मिरज | १०१.०० |
| २ | ,, सी. व्ही. साकळकर | पुणें ५ | १००.०० |

## बिल्डिंग फंड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. टी. व्ही. रोमाचारी | सोलापूर | ३००·०० |
| २ | ,, कमला रंगनाथ | मद्रास | १४१·०० |
| ३ | ,, पुंडलिक दिनाजी ठाकरे | देऊळगांव, यवतमाळ | १०१·०० |
| ४ | ,, बी. लक्ष्मीनारायण | नालगोंडा | १३०·२६ |
| ५ | ,, उखाभाई जिवाभाई पटेल | वुडवी (सुरत) | ३७५·०० |

## कायम फंड

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री. एम्. एच्. वालावलकर | मुंबई २८ | ३५०·०० |
| ७ | एक साईभक्त | | २७०·०० |

## साईभक्तांनीं संस्थानला दिलेल्या १०० रु. पेक्षां जास्त वस्तुरूपी देणग्या.

| नांव | ठिकाण | वस्तू | रु. न.पै. |
|---|---|---|---|
| श्री. गोपाळराव नाडकर्णी | मुंबई | चिप्स | १७५·०० |
| ,, सांडू भावराव पाटील | वेरोळी | तुकडा | १०९·०० |
| ,, वसंत अनंत पंडीत | मुंबई | चेन | १३०·०० |
| ,, पी. जे. सोलव | अमरावती | कंठा | ५०६९·६५ |
| ,, पुरुषोत्तम एम. तोलाणी | मुंबई | हार | २५०·०० |



## वर्गणीदारांस विनंती

अजूनहि ज्यांनीं श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी रु. ५ पाठविली नसेल त्यांनीं ती कृपा करून स्मरणपूर्वक लौकर पाठवावी अशी विनंती आहे.

व्यवस्थापक — **श्रीसाईलीला**
साई निकेतन, व्हिन्सेंट रोड
प्लॉट नं. ८०४ बी, दादर
मुंबई नं. १४.

# श्री साईनाथ वाचनालय, शिर्डी

( व्यवस्थापक यांजकडून )

शिरडी येथील श्रीसाईनाथ वाचनालयास निरनिराळ्या ठिकाणच्या भक्तांकडून देणगीदाखल पुढील पुस्तकें आलीं असून तीं आभारपूर्वक प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

| अ. नं. | नांव | पत्ता | पुस्तकें | पुस्तकाचें नांव |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शाम खुशालचंद गंगवाळ | शिर्डी | १ | न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे चरित्र |
| २ | ,, शिवनेसस्वामी | कोइमतूर | १ | श्री रमण महर्षि (हिंदी चरित्र) |
| ३ | डिव्हाईन लाईफ सोसायटी | बंगलोर | १ | श्रीशिवानंदस्वामी चरित्र |
| ४ | दिवाळी अंक वाचक मंडळ | शिर्डी | २५ | पुस्तकें ( ग्रंथ व चरित्रें ) |
| ५ | श्री. गंगाधर त्रिंबक कर्णिक | मुंबई | ३ | श्रीमच्छंकराचार्य विरचिता<br>मृत्युनंतर काय ?<br>योगी अरविंद व अंतर्ज्ञान |
| ६ | ,, पी. एस. व्ही. अय्यर | कलकत्ता | २ | संपूर्ण सद्गुरुगण ( हिंदी ) |
| ७ | सौ. सुमती अय्यर | कोपरगांव | २ | टू लिव्ह इन पीस ॲन्ड फ्रेंड-शीप ( इंग्लिश ) |
| ८ | श्री. नथ्थु फकीरा | लोणी | २ | साईनाथ व साईनाथ भजनावली |
| ९ | कु. शशीकला नागेशराव सावंत | मुंबई | ३ | सत्यबाला ( कादंबरी ) प्रतिज्ञा व प्रीतिची ओढ (कादंबरी) |
| १० | श्री. एम्. एन्. कुलकर्णी | मुंबई | १ | कुलाबा वर्णन |
| ११ | ,, लक्ष्मीचंद राघवजी | मुलुंड | १ | साईसुमन गुजराथी मासिक पुस्तक |
| १२ | ,, के. एन्. थानू अय्यर | त्रावणकोर | १ | दि सॅन्क्टीटी ॲन्ड गाईड टू पिलग्रीम ऑफ केप कामोरीन |
| १३ | ,, गेरार्दबादर एस. जे. | पुणें | १ | येशूचा प्रेममार्ग |
| १४ | ,, वसंत शंकर कुलकर्णी | कुर्ला | ३ | महाभारत भाग १ ला, २ रा व श्रीरामायण. |

१५ सौ. सुमित्राबाई एस. केरकर—रामकुंज शिवाजी पार्क, मुंबई यांजकडून पुढील संस्कृत, इंग्रजी व मराठी पुस्तकें आलीं:—

**संस्कृत** : पाठ्यमंजुषा. सार्थ सुभाषितानी.

**इंग्रजी** : Straight & Crooked Thinking. Cherry Orchard. Pancha Tantra. Ramayana. Bhagwat Geeta. Hindu Civilization.

**मराठी** : मधु घट ( काव्यसंग्रह ). घाटावरील लोकगीतें. आईबाप व मुलें. कारागृहाच्या भिंती. गीता प्रवचनें. स्थितप्रज्ञ दर्शन. उज्वला ( काव्य-संग्रह ). संस्कृति-संगम.

वरील पुस्तकें वाचनालयास देणारांचे आम्ही फार आभारी आहोंत.—**व्यवस्थापक.**




## एप्रिल १९६१

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्तांची श्रींच्या दर्शनासाठीं बरीच गर्दी होत असे. कांहीं कलावंतानी श्रीपुढें हजेरी दिली. ती खालील प्रमाणें :—

**कीर्तन :**—श्री. ह. भ. प. गोपिकाबाई भोसले मु. उस्मानाबाद, संस्थानगवई श्री. मराठे. श्री. भाऊ महाराज कुंभार यांची पुण्यातिथी श्री. अक्कलकोट स्वामी पुण्यतिथी, चैत्र वा ११ वैशाख शु॥ ११ अशी चार कीर्तनें श्रीपुढें झाली.

**गायन :**—श्री. हिराबाई बडोदेकर. पुणें, श्री. सरस्वतीबाई राणे पुणें. श्री. कमलाबाई बडोदेकर पुणें. श्री. पंडितराव नगरकर पुणें. श्री. सौ. सिंधूताई बिलहीकर, लक्ष्मीवाडी ( कोपरगांव ) श्री. श्रीमतीबाई नार्वेकर मुंबई. श्री. सौ. प्रेमलता वसंत बेंदूर मु. विराट जि. ठाणे, श्री. सौ. इंदुमती चौबळ, मुंबई. श्री. बी. व्ही. जाधव. कोल्हापूर. श्री. कृष्णराव वऱ्हाडकर मुंबई, श्री. जयवंत कुलकर्णी विलेपारलें. श्री. सुधीर केसकर मुंबई.

**भजनी मंडळ**—श्री. गुरुदेव भजन मंडळ मु. नायगांव जि. अकोला ( वऱ्हाड ) श्री. महादेव काजरोळकर मुंबई, श्री सुगंध भजन पार्टी अंबरनाथ, श्री ज्ञानेश्वर भजनी मंडळ लक्ष्मीवाडी ( कोपरगांव ). श्री साईधाम भजन मंडळ, मुंबई. कु. चेतुरकर.

**जादू प्रयोग**—श्री सालोमन शांतवन तळवे मु. मढी, जि. नगर.

**लोकनाट्य,** व पवाडे शाहीर पांडुरंग आबाजी शिंदे, मु. कुरकम जि. पुणें.

**तबलावादन**—श्री. वसंतराव शिरोडकर पुणें.

**हार्मोनियमवादन**—श्री. एकनाथ काशिनाथ चव्हाण, पुणें.

**मोठी देणगी** श्री. प्रभाकरराव जयरामजी सोलव, मु. पुणे, बारगांव ता. मोरशी, जि. अमरावती, प्रसिद्ध नागपुरी संत्रेचे व्यापारी यानी श्रीस ता. २०-४-६१ ( सोन्याचा गोफ ) पांच हजार रुपयांचा शास्त्रोक्तमंत्र विधीपूर्वक श्रीसाईबाबांचे मूर्तीचे गळ्यांत घातला. श्रींची महापूजा केली.

**शिर्डी येथील हवापाणी**—हवेंत उष्मा बराच आहे. बाकी हवा निरोगी उत्तम आहे.

---




तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**

**रमतापूर, हैद्राबाद ३. [ आंध्र प्रदेश ]**


